www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **तरुणांचा बुलंद आवाज** मराठी

# युवक आधार




मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 293 | मंगळवार दि. 08 जुलै २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

## भारतीयांचा जगात डंका ! ICCच्या CEO पदी संजोग गुप्ता यांची निवड, ठरले केवळ दुसरे भारतीय

जागतिक स्तरावर भारतीय क्रिकेटचे नाव हळूहळू मोठे होत आहे. सध्या ICCच्या चेअरमन पदावर भारतीय व्यक्ती विराजमान आहे. BCCIचे माजी सचिव जय शाह यांना तो बहुमान मिळाला आहे. तशातच आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) संजोग गुप्ता यांना त्यांचे नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हणून नियुक्त केले आहे. संजोग गुप्ता यांनी सोमवारी ७ जुलैपासून ही जबाबदारी स्वीकारली. संजोग यांनी ऑस्ट्रेलियाचे जेफ ॲलार्डिस यांची जागा घेतली. ते २०२१ पासून या पदावर होते. संजोग हे आयसीसीचे सातवे सीईओ आहेत आणि मनु साहनी यांच्यानंतर ही जबाबदारी स्वीकारणारे ते दुसरे भारतीय ठरले.

संजोग गुप्ता सध्या जिओस्टारमध्ये सीईओ (क्रीडा आणि थेट प्रक्षेपण विशेष अनुभव) म्हणून काम करत आहेत. भारतातील खेळांच्या डिजिटल आणि टीव्ही प्रसारणाला नवीन दिशा देण्यात संजोग यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. इंडियन प्रीमियर लीग (IPL), आयसीसीच्या स्पर्धा, प्रो कबड्डी लीग (PKL) आणि इंडियन सुपर लीग (ISL) सारख्या मोठ्या क्रीडा स्पर्धा लोकप्रिय करण्यात संजोग गुप्ता यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**पत्रकार ते ICC चे CEO ... प्रेरणादायी प्रवास**

संजोग गुप्ता यांनी पत्रकार म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. २०१० मध्ये ते स्टार इंडियामध्ये सामील झाले. नंतर त्यांनी डिस्ने-स्टारचे क्रीडा प्रमुख म्हणून काम पाहिले. तेथे संजोग यांच्या नेतृत्वाखाली क्रीडा विभागाचा व्यावसायिक विस्तार झाला. त्यासोबतच, प्रेक्षकांची संख्याही वाढली. त्यांच्या याच अनुभवामुळे आता त्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेत जबाबदारीचे पद मिळाले.

**जय शाह म्हणाले...**

ICCचे अध्यक्ष जय शाह यांनी संजोग गुप्ता यांच्याबद्दल सांगितले की, संजोग यांना क्रीडा नियोजन आणि व्यापारीकरणाचा व्यापक अनुभव आहे. क्रिकेटबद्दलची त्यांची आवड आणि तंत्रज्ञानाची समज या खेळाच्या जागतिक विस्तारात महत्त्वाची भूमिका बजावेल. ऑलिंपिकसारख्या व्यासपीठांवर क्रिकेटला नियमित स्थान मिळावे असा आमचा प्रयत्न असेल. आम्ही या पदासाठी अनेक उमेदवारांचा विचार केला होता, परंतु नामांकन समितीने एकमताने संजोग यांची शिफारस केली. आयसीसी संचालक मंडळ त्यांच्यासोबत काम करण्यास उत्सुक आहे आणि मी आयसीसीमधील सर्वांच्या वतीने त्यांचे स्वागत करू इच्छितो.

| ICCचे आतापर्यंतचे CEO |
|---|
| डेव्हिड रिचर्ड्स (ऑस्ट्रेलिया): १९९३-२००१ |
| मॅल्कम स्पीड (ऑस्ट्रेलिया): २००१-२००८ |
| हारून लॉर्गट (दक्षिण आफ्रिका): २००८-२०१२ |
| डेव्हिड रिचर्डसन (दक्षिण आफ्रिका): २०१२-२०१९ |
| मनु साहनी (भारत): २०१९-२०२१ |
| ज्योफ ॲलार्डिस (ऑस्ट्रेलिया): २०२१-२५ |
| संजोग गुप्ता (भारत): २०२५ पासून सुरूवात |

## रोडेश्वर विद्यालयाचा दिंडी सोहळा – विठ्ठलनामात न्हालं चिमुकल्यांचं भाविक मन

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :-**
**मारुती सत्रे**



दि.5 जुलै रोजी डोंगरगण – आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त रोडेश्वर विद्यालय,डोंगरगण येथे विद्यार्थ्यांनी भाविकतेने भरलेला दिंडी सोहळा साजरा केला. शाळेतील चिमुकल्यांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या नामस्मरणात सहभागी होत पारंपरिक वेशभूषा, टाळ-मृदुंगाच्या गजरात भक्तिरसात न्हालेली वारी साकारली. विद्यार्थ्यांनी पंढरीच्या वारीची अनुभूती शाळेच्या परिसरात जागवली. "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषात दिंडी मार्गस्थ झाली. काही विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम, संत नामदेव यांची वेषभूषा करून उपस्थितांची मने जिंकली. माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब, प्रशासकीय अधिकारी,यांच्या मार्गदर्श ना खाली. मुख्याध्यापक,निकाळजे सर,शिंदे सर,वाघ सर,शेलार सर,गायकवाड सर,बन्सोडे सर,जरे सर,वाघुले सर,बोरुडे मॅडम,शिवरकर मॅडम,शरद तळेकर आणि सरपंच, उपसरपंच,पंचायत सदस्य, पालक वर्गही या सोहळ्यात सहभागी झाले होते. शिस्तबद्ध मिरवणूक,भक्तीमय वातावरण आणि विद्यार्थ्यांची तयारी यामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.

## एकादशीच्या शुभमुहूर्तावर कन्यारत्नाचा जन्म; सौ. मनिषा आवारे यांच्याकडून भेटवस्तूंनी अनोखे स्वागत

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**



**विंचूर :-** धार्मिक, आध्यात्मिक आणि सकारात्मक ऊर्जा घेऊन येणाऱ्या आषाडी एकादशीच्या पवित्र दिवशी लासलगाव येथील आवारे हॉस्पिटलमध्ये चार गोंडस चिमुकल्यांनी जन्म घेतला. या मंगल प्रसंगी हॉस्पिटलच्या संचालिका सौ.मनिषा आवारे यांनी स्वतः पुढे येत नवजात मुलींना भेटवस्तूंनी सत्कार करून एक सकारात्मक आणि समाजाला संदेश देणारी कृती केली. गेल्या काही काळात समाजात मुलींच्या जन्माबाबत नकारात्मकता, भेदभाव आणि दुर्लक्षाची प्रवृत्ती दिसून येत असताना, सौ. आवारे यांचा हा उपक्रम आशेचा किरण वाटतो. नवजात बाळाला कपडे, उबदार पांघरूण, आणि आवश्यक बाळसंगोपन साहित्य देऊन तिच्या आगमनाचे अनोखे स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे, या बाळाचे स्वागत 'एकादशीच्या प्रसादाप्रमाणे पुण्यप्रद' मानून साजरे करण्यात आले.

या उपक्रमामुळे उपस्थित डॉक्टर्स, नर्सेस, आणि कुटुंबीय भावूक झाले. चिमुकलीच्या आई-वडिलांनीही समाधान व्यक्त करत सौ. आवारे यांचे आभार मानले. या उपक्रमामुळे एक सामाजिक भान जपणारी, संवेदनशीलतेने भरलेली आदर्श नोंद परिसरात उमटली असून, इतर संस्थांनी यापासून प्रेरणा घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. एकादशीचा दिवस हा आध्यात्मिक शुद्धतेचा आणि नवसंकल्पांचा असतो. अशा शुभदिनी एका चिमुकलीचा जन्म होणं हे आनंददायक आणि शुभसंकेत आहे. आजही अनेक ठिकाणी मुलींचा जन्म दुर्लक्षित केला जातो, पण आम्ही त्याचे स्वागत सणासारखे करू असा निश्चय केला आहे. प्रत्येक मुलगी ही भविष्याची शिल्पकार आहे.
सौ.मनिषा आवारे



## राळेगाव येथे शासकीय गोडाऊनला आग ; १ हजार ४९१ क्विंटल ज्वारी जळून खाक

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**



**राळेगाव** : दिनांक ६ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास राळेगाव येथील शासकीय गोडाऊनला अचानक आग लागून एकच खळबळ उडाली. या भीषण आगीत शासनाने शेतकऱ्यांकडून खरेदी केलेली सुमारे १४९१ क्विंटल ज्वारी जळून खाक झाली असल्याची माहिती समोर आली आहे.प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज प्रशासनाने वर्तविला असून, रविवार असल्यामुळे गोडाऊनमधील कामकाज पूर्णपणे बंद होते. त्यामुळे मानवी हानी टळली असली तरी अन्नधान्याचे मोठे नुकसान झाले आहे. आगीची माहिती
मिळताच राळेगाव अग्निशामक दल तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. परंतु आग आटोक्यात न आल्याने कळंब आणि यवतमाळ येथूनही अग्निशामक गाड्या पाचारण **पान २ वर**

## संजीवनी संस्था मार्फत वाई गावामध्ये आठ हजार 200 फळ झाड.

### मोफत वाटप करण्यात आले. चिकू आंबा. सीताफळ. लिंबूनि. इत्यादी फळझाड वाटप करण्यात आले आहे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी नामदेव मंडपे मंठा**

वाई. गावामध्ये
संजीवनी संस्थान मार्फत वाई गाव मध्ये आठ हजार दोनशे फळझाड मोफत वाटप करण्यात आले चिकू. आंबा. सिताफळ. लिंबोणी. राठोड सर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले आहे ग्रामपंचायत सदस्य कैलास निमट. चंद्रकांत उबाळे. नामदेव मंडपे यांच्या हस्ते फळझाड वाटप करण्यात आले आहे. यावेळी शेतकरी. शिवाजीराव अरसूळ .विलास मंडपे. दगडोबा आरसुळ .रामेश्वर अडसूळ. पवन मडपे .प्रकाश काटे .अशोक पवार .अमोल उबाळे .अरुण उबाळे .इत्यादी शेतकऱ्यांना. वाटप करण्यात आले आहे



.बाकीच्या शेतकऱ्यांना वार्ड क्रमांक .एक. मध्ये विलासराव मंडपे. यांच्या इथे फळझाड ठेवण्यात आले आहे .

## प्रति वर्षाप्रमाणे पढरपूर माऊली दिंडीच्या शोभायात्रेने नांदेड मध्ये भक्तीमय वातावरण हजारो भाविकांचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



पंढरपूरला प्रत्यक्ष जाणे शक्य नसले ल्या भाविकांसाठी अध्यात्मिक आनंद देण्यासाठी आयोजित केलेल्या 'प्रति पंढरपूर' माऊली दिंडीच्या शोभायात्रे ने नांदेड मध्ये भक्तीमय वातावरण निर्माण झाले हजारो भाविकांचा सहभाग या शोभायात्रेत नोंदवला गेला नामदेव मंदिरात सुशोभित असलेल्या विठ्ठल रुख्माई आणि संत नामदेव महाराज यांची आरती झाल्यानंतर येथून शोभायात्रेची सुरुवात झाली जुना मोंढा टॉवर, बालाजी मंदिर, पंचवटी हनुमान मंदिर, मुथा चौक वजिराबाद, एस. पी. ऑफिस चौक, कालामंदिर अशी शोभा यात्रा काढण्यात आली. सोमेश कॉलनी येथील स्वामी समर्थ मंदिर येथे सांगता करण्यात आली. जवळपास ५० हजार भाविक भक्त या शोभायात्रेत सहभागी झाल्या होते. माऊलींचा जिवंत देखावा लेझीमपथक, टाळकरी संच, झाशीच्या राणीचा देखावा. ड्रेस कोडमधील भजनी महिला मंडळ, शौर्य पथक सादर करणारे बाल कलाकार हे शोभायात्रेतील प्रमुख आकर्षण राहिले. दिंडीचे नेतृत्व डॉ. रमेश नारलावार यांनी केले. आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, माजी राज्यमंत्री डी पी सावंत, जिल्हा परिषदे चे माजी अध्यक्ष संभाजीराव धुळगुंडे, भाजपा चे संघटन मंत्री संजय कोडगे, मर्चंट बँकेचे अध्यक्ष दिलीप कं दकुर्ते, उपाध्यक्ष लक्ष्मणराव संगेवार, सरदार दिलीपसिंघ सोडी, नानक साई फाऊंडेशन चे अध्यक्ष तथा वरिष्ठ मेरू शिंपी समाजाचे अध्यक्ष शंकरराव सिंगेवार, गजानन महाराज मंदिर संस्थान अध्यक्ष डॉ. तुकाराम तळणकर, डॉ संजय मानाठकर, मोहन पाटील, गणेश ठाकूर, डॉ. नरेश रायेवार, अनिल पापंटवार, मधुकर मोतेवार, गजानन पिंपरखेडे वकील, सौ प्रफुल्ला बोकारे, सौ जयश्री देवसरकर, सौ. प्राची चौधरी, सौ अश्विनी देशमुख, लक्ष्मी पुदोड पुरणशेट्टीवार, सौ. माला शर्मा, डॉ विद्या पाटील, ज्योती पाटील, मीनाक्षी पाटील,धनंजय उमरीकर, सौ. संध्याताई छपरवाल, यांनी पालखीचे दर्शन घेतले

लॉन्स क्लब च्या वतीने महावीर चौक येथील हनुमान मंदिर येथे दोन क्विंटल ची शाबुदाना खिचडी वाटप करण्यात आली नानक साई फाऊंडेशन, इनर व्हील, राजस्थानी महिला मंडळ तर्फे वजिराबाद मुथा चौकात पालखीचे जोरदार स्वागत करून पुष्पवृष्टी करण्यात आली.

## लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये इन्वेस्टीचर्स सेरेमनी





**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये तृतीय इन्वेस्टीचर्स सेरेमनी मोठ्या उत्साहात साजरा झाला. संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि स्कूलचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर व नायब तहसीलदार सुनील जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या समारंभात शालेय मंत्रिमंडळ स्थापन करून विद्यार्थ्यांचा शपथविधी झाला.

या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, 'रयत'चे रायगड उपविभागीय अधिकारी विलासराव जगताप, पीआरओ बाळासाहेब कारंडे, खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, नवीन पनवेलच्या सीकेटी विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, पर्यवेक्षिका रुहल दुबे, उलवेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल मुख्याध्यापक श्री. सुतार, कोमल गायकवाड यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. इन्वेस्टीचर्स सेरेमनीत विद्यार्थ्यांवर सोपविण्यात आलेली जबाबदारी ते यशस्वीरीत्या बजावतील, असा विश्वास या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त करून कामोठ्यातील ही शाळा रयत शिक्षण संस्थेमधील एक नामवंत शाळा आहे, असे गौरवोद्गार काढले. शाळेचे नावलौकिक कायम राखणे हे आपल्या सर्वांचेच काम आहे, असेही ते म्हणाले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली.

## करंजा मच्छीमारांची कोट्यावधींची फसवणूक करणाऱ्यांचे जामीन अर्ज फेटाळले.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**





उरण तालुक्यातील करंजा मच्छीमार बंदरातील मच्छीमारांची कोट्यावधींची मच्छी खरेदी करून पैसे न देता फसवणूक करणाऱ्या दलाल, व्यापारी निर्यातदारांचा जामीन अर्ज जिल्हा सत्र न्यायालयाने शनिवारी फेटाळून लावला आहे. त्यामुळे फरार असलेल्या या आरोपींना अटक करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. करंजा बंदरातील शेकडो स्थानिक मच्छीमारांनाही परिचित स्थानिक दलालांवर विश्वास ठेवून कोट्यावधी रुपयांची मच्छी विक्रीचे व्यवहार केले आहेत, सुरुवातीला निर्यातदार कंपन्या व्यापाऱ्यांनी स्थानिक मच्छीमारांना मालाचे पैसे देऊन मच्छीमारांचा विश्वास संपादन केला. मात्र त्यानंतर खरेदी केलेल्या मासळीचे पैसे देण्यात दलाल, व्यापारी टाळाटाळ करू लागले. थकीत रक्कम अदा न करताच निर्यात कंपनी व्यापाऱ्यांनी पळ काढला होता. या प्रकरणी उरण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता गुन्हा झाल्यापासून आरोपी फरार आहेत त्यांनी जिल्हा सत्र न्यायालयात जमिनीसाठी केलेला अर्ज फेटाळून लावला असल्याची माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी दिली.

# उरण महिला सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेकडून आषाढी वारी साठी फराळ वाटप.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

आषाढी एकादशी किंवा देवशयनी एकादशी ही पंचांगातील महत्त्वाची तिथे आहे हा वारकरी संप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव आहे वैष्णवांसाठी या पवित्र दिवसाचे विशेष महत्त्व आहे आषाढी एकादशीच्या दिवशी लाखोंच्या संख्येने वारकरी भक्त पंढरपुरामध्ये विठुरायाच्या दर्शनासाठी दाखल होतात अध्यात्मिक धार्मिक दृष्टिकोनातून या दिवसाला खूप महत्त्व आहे. आणि हिच आषाढी एकादशी जशी पंढरपुरात भक्तीभावाने साजरी केली जाते तशी च प्रत्येक गावात, शाळेत, मंदिरात हि साजरी केली जाते. ज्या विठुच्या भक्तांना पंढरपुरात जाणे शक्य होत नाही, ते भक्त वारीचा आनंद वारीचा भक्ती मय प्रवास आपल्या परिसरात




निघणाऱ्या वारीमध्ये घेत असतात. यावेळी या वारीमध्ये पंढरपुरातील वारीसारखेच अभंग, भक्तीगीते, वाडीतील झेंडे, फुगड्या, रिंगण अशा भक्तिरसात या वारीला पंढरपूरच्या वारीचे स्वरूप प्राप्त होते. उरण महिला सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेकडून श्री क्षेत्र मोरा कोळीवाडा उरण येथून निघणाऱ्या पायी वारीतील वारकरी भक्तांसाठी उपवासाचा फराळ व पाणी वाटप करण्यात आले. मोरा येथून निघणाऱ्या पायी दिंडीचे ठिक ठिकाणी स्वागत करण्यात आले. राजेश पाटील यांनी हि दिंडी साठी फराळ दिला. हि दिंडी भवरा, बोरी, पेन्शनर पार्क, देऊळवाडी, कडून नागाव येथील जीवनमुक्त स्वामी मठाकडे रवाना होते, व पुढे या दिंडीची सांगता होते. या पायी आलेल्या वारीसाठी उरण महिला सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेकडून स्वामी विवेकानंद चौक येथे वारी आली असता संस्थेकडून देण्यात फराळ देण्यात आला. उरण महिला सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेतील सदस्यांनी आषाढी एकादशी च्या निमित्ताने सर्व महिला सदस्यांनी पारंपरिक खणाची साडी व खणाची पारंपरिक टोपी असा सोवळ्या तील वस्त्रे परिधान करून विठुमाऊली च्या दिंडीत सर्व सहभागी झाल्या व दिंडी चा आनंद घेतला. या वारकरी दिंडीत उरण चे आमदार महेश बालदी यांनी देखील उपस्थिती दाखवली. मोरा कोळीवाडा उरण येथून निघालेली वारी मंदिरात गेल्यानंतर संस्थेच्या सर्व महिला बोरी येथील श्री क्षेत्र विठ्ठल रखुमाई च्या मंदिरात माउलीचे दर्शन घेऊन ती थे सर्वांनी भक्तीगीते व अभंग गाऊन श्रीसेवा दिली. उरण महिला सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेच्या अध्यक्षा गौरी देशपांडे, निशा शिरधनकर, कल्याणी दुखंडे,दिपा शिंदे, दिपा मुकादम, जोस्ना येरूणकर, वर्षा पाठारे, प्रगती दळी,गीता पवार , संगीता पवार, शुभांगी शिंदे, गौरी मंत्री दया परदेशी आदी सदस्यांनी मिळून हिआषाढी वारी भक्तिरसात साजरी झाली.



सध्या नायलॉन धाग्याच्या जाळ्याने मासेमारी केली जाते त्यामुळे समुद्रातील जीवांना त्याचा खूप त्रास होतो.. असच आज रायगड जिल्यातील श्रीवर्धन दांडा विभागातील समुद्रकिनारी एक भलेमोठे कासव जाळ्यामध्ये अडकून किनाऱ्यावर आले होते जाळ्यामुळे त्याला नीट पोहताना सुद्धा येत नव्हते.. श्रीवर्धन दांडा येथील गणेश पालेकर, संदेश तोडणकर, देवेंद्र मयेकर, स्वप्नील चोगले या निसर्ग प्रेमींनी..त्याला पाहिल्यानंतर त्याची जाळ्यातून सुटका करून सुखरूप समुद्रामध्ये सोडले.

**( दैनिक युवक आधार )**

## अनसिंग येथील नळ कनेक्शनमध्ये शासकीय निधीचा अपव्यय करणाऱ्यांची चौकशी न झाल्यास जि.प. समोर आत्मदहन करणार.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

**अनसिंग( ता.७ )** अनसिंग येथे ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागा मार्फत 1181 नळ कनेक्शन च्या कामासाठी एकूण 48 लाख रुपये खर्च दाखवण्यात आला असून, प्रत्येकी कनेक्शनसाठी सुमारे ३४००रू. खर्चाचा दाखला आहे. मात्र प्रत्यक्षात केवळ चारशे ते पाचशे नागरिकांना कनेक्शन (नळजोडणी केली )मिळाले असून उर्वरित कनेक्शन (नळजोडणी) केवळ कागदोपत्रांवर दाखवण्यात आली.असून ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असल्यामुळे शासकीय निधीचा अपव्यय व जनतेची फसवणूक करण्यात आलेल्या अधिकारी व ठेकेदाराची येत्या सात दिवसात चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात न आल्यास जिल्हा परिषद कार्यालयावरून आत्मदहन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते यश चव्हाण यांनी दि. ७ जुलै रोजी कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, वाशीम यांच्याकडे केली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, पाणीपुरवठा विभागामार्फत जल जीवन मिशन अंतर्गत अनसिंग शहरात प्रत्यक्ष किती नळ कनेक्शन (नळजोडणी) देण्यात आले, याची चौकशी करुन संपूर्ण माहिती जनतेसमोर ठेवून, सदर प्रकरणात जबाबदार असलेले अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करुन उर्वरित पात्र लाभार्थ्यांना लवकरात लवकर नळजोडणी उपलब्ध करून द्यावेत. सदर निवेदनाच्या प्रतिलिपी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. वाशीम, उपविभागीय कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग जि.प. वाशीम व पोलिस स्टेशन अनसिंग यांना देण्यात आल्या आहेत.

**सामाजिक कार्यकर्ते यश चव्हाण यांचा निवेदनाद्वारे इशारा.**

## राळेगाव येथे शासकीय गोडाऊनला आग ; १ हजार ४९१ क्विंटल ज्वारी जळून खाक

**पान १ वरून**

करण्यात आल्या. तिन्ही गाड्यांच्या साह्याने आग नियंत्रणात आणण्यात यश आले. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस प्रशासन तसेच शहरातील सामाजिक कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी आग विझवण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली. सध्या गोडाऊन परिसर बंद करून पंचनामा करून,नुकसानाचे नेमके मूल्यमापन करण्याचे काम प्रशासनाच्या पथकाकडून सुरू आहे. घटनेचा सखोल तपास करण्यात येत असून शॉर्टसर्किटची शक्यता असल्याने विज वितरण विभागाकडूनही चौकशी सुरू आहे. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे धान्य जळून गेल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी यासाठी स्थानिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे.

# पुसद मुळावा बस रात्री 8 वाजता लोनदरी घाटात पंचर प्रवाशी त्रस्त

### ग्रामीण भागातील रात्र पाळीच्या बस कडे पुसद आगाराचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी**
**राजू गायकवाड**

पुसद मुळावा ही बस गेल्या अनेक वर्षांपासून लोनदरी मार्गे चालू आहे या बस मुळे पुसद येथे शिक्षण घेणारे लोनदरी,धनज, मोहदरी,माळआसोली येथील विध्यार्थी विध्यार्थिनी येणे जाणे करतात शिवाय पुसद येथील बाजारपेठ चांगली असल्यामुळे ग्रामस्थ महिला वृद्ध या बस वर नियमित जात असतात पण गेल्या काही दिवसापासून असे निदर्शनास आले आहे कि बस वेळेवर लागत नाही बहुतांश मुली ह्या बस मध्ये असतात आणि मुळावा येणाऱ्या बस ला नावाचे बोर्ड पण नसते यामुळे प्रवाशांना नाहक त्रास होतो ह्या सर्व बाबींना आगार व्यवस्थापक आणि प्रशासन जबाबदार आहे कारण 6 जुलै रोजी रात्री 8 वाजता बस ही लोनदरी घाटात उभी होती चालक पांडे आणि वाहक इंगळे यांना



विचारपूस केली असता त्यांनी सांगितलं कि बस चा समोर चा टायर पंचर आहे आणि गाडीमधे स्टेपणी उपलब्ध नाही यावेळी जोरदार पाऊस चालू होता आणि बस मध्ये महिला वर्ग जास्त प्रमाणात होता त्यावेळी आगारास फोन केला असता त्यांनी दुसरी बस पाठवतो म्हणून संगितलं आणि रात्री उशिरा दुसरी बस आली तेव्हा सर्व प्रवाशी पोहचले यावर प्रशासनाने लक्ष द्यायला पाहिजे असे परिसरातील लोकांचे म्हणणे आहे.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये फाउंडेशन कोर्सचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना जेईई आणि नीट या स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करण्यासाठी फाउंडेशन कोर्स सुरू करण्यात आला असून त्याचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी आयोजित सेमिनारची सुरुवात राज अलोनी यांनी पालकांच्या प्रमुख चिंता, जसे की, कोणता बोर्ड निवडायचा आणि कधी निवडायचा तसेच कोचिंग सेंटरमधील एकात्मिक वर्ग आणि शाळांमधील फरक यावर चर्चासत्राने झाली. त्यानंतर एकात्मिक अभ्यासात अडचणी येणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा कशी मदत करते हे स्पष्ट करत वरिष्ठ माध्यमिक समन्वयक इफत काटे यांनी जेईई आणि नीट परीक्षांबाबत सविस्तर मार्गदर्शन दिले. या वेळी विविध शैक्षणिक कार्यक्रम आणि स्पर्धात्मक प्लॅटफॉर्मद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचारसरणी आणि समस्या सोडवण्याची वृत्ती वाढवण्यासाठी शाळेने सुरू असलेल्या उपक्रमांवरही भर देण्यात आला.

या कार्यक्रमास संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, संचालक अर्चना ठाकूर, सदस्य राहुल घरत, आयआयटीयन हबचे संस्थापक डॉ. सौरभ प्रियदर्शी, डॉ. रजनीश कुमार आदी उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पालकांना त्यांच्या मुलांना शैक्षणिक उत्कृष्टतेच्या प्रवासात पाठिंबा देण्यास आणि मार्गदर्शन करण्यास प्रोत्साहित केले.

# प्राथमिक आरोग्य केंद्रात तहसीलदार व आरोग्य अधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण!

### सामाजिक कार्यकर्ते डॉ.हरिदास शेलार यांच्या संकल्पनेतून दासखेडचे प्राथमिक आरोग्य केंद्र झाले हिरवेगार..!

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** - सामाजिक कार्यकर्ते डॉ.हरिदास शेलार यांच्या प्रयत्नातून वाय.व्हि.माने कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड बारामती यांचा उपक्रम दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे वाय.व्हि.माने कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड बारामती यांचा मार्फत दि. ०७ जूलै रोजी फळ झाडें व फुल झाडे लागवड करून पर्यावरण संरक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. या वेळी कंपनीच्या वतीने झाडे लागवड करण्यात आली. चाळीस झाडे भेट देण्यात आले. मागील आठ दिवसांपासून सन पॉवर प्रायव्हेट



लिमिटेड चे प्रकल्प समन्वयक मोहन गाडे यांच्या वतीने १२० झाडे भेट दिली होती. यांचाच भाग म्हणून निसर्गासाठी काही तरी केले पाहिजे. तेजेस माने यांना सुध्दा या बदल मागणी केली. निसर्गाचे संरक्षण आणि संगोपन करणे हे आजच्या काळाची गरज आहे. प्रत्येक व्यक्तीने किमान आयुष्यात १०० झाडे लावायला पाहिजे, परंतु आजच्या काळात हे चित्र दिसत नसून पर्यावरणाचे महत्व फार कमी दिसून येते. त्या मुळे नागरिकांकडून पर्यावरण संरक्षण आणि संगोपन व्हावे. शाश्वत असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्ती पर्यावरणाचे महत्त्व लोकांना कळावे, म्हणून संन पावर प्रायव्हेट लिमिटेड व वाय.व्हि.माने कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड बारामती, अंतर्गत शाश्वत उपजीविका आणि पर्यावरण सुरक्षा हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

पर्यावरण सप्ताह वन बीज वनस्पती, फुले, लागवड व पर्यावरण हे आपल्या सभोवतालचे नैसर्गिक जग आहे. पाटोदा तहसीलदार दत्तात्रय निलावड साहेब, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.नरेंद्र कासट यांनी भेट दिली या वेळी डॉ.शरयू पडोळे, सय्यद कादर, सामाजिक कार्यकर्ते डॉ.हरिदास शेलार, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, मंडळ अधिकारी तोगे, तलाठी दिलीप नागरगोजे, महसूल सेवक अंगद तैरे, गणेश मस्के, प्रदिप गोरे, राहुल चव्हाण, शेख मिनाज ताई, लखन पवार, गणेश सरडे, नितेश राख, शुभम राख, अश्विनी सोनवणे, सुंदर तावरे, सुदाम रसाळ,वाय.व्हि. माने.कन्ट्रक्शन बारामती इंजि.तेजेस माने, अनिल टेकाळे, कृष्णात भोवाळ, राजेंद्र शितोळे, जय पिसे यांच्या सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उच्च न्यायालयाकडून उरणमधील अनधिकृत इमारती तोडण्याचे आदेश !

### बिल्डर लॉबीच्या दहशतीखाली उरण शहर ! तालुक्याची 'बिहार मॉडेल'कडे वाटचाल?

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरणमध्ये अनेक वर्षे तक्रारी करूनही दुर्लक्षित ठेवलेल्या एका मोठ्या बेकायदेशीर इमारती प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश देत ती इमारत तोडण्याचे आदेश दिले आहेत. या निकालामुळे संपूर्ण उरण तालुक्यात खळबळ उडाली असून सरकारी यंत्रणेतील अधिकाऱ्यांची अर्थपूर्णव्यवस्था, निष्क्रियता आणि बिल्डर लॉबीशी असलेली साटेलोटे उघड झाले आहेत. 2014 साला पासून सुरु असलेला हा संघर्ष,अखेर 2024 मध्ये कोर्टात याचिका दाखलकरण्या पर्यंत पोहचला या अगोदर तक्रारदाराने 2014 पासून जिल्हाधिकारी, तहसीलदार, पंचायत समिती, ग्रामपंचायत, सिडको यांच्याकडे या बेकायदेशीर इमारतीविषयी तक्रारी केल्या होत्या. मात्र, कुठल्याही अधिकाऱ्याने कारवाई केली नाही. उलट बिल्डरची पाठराखण करून गोरगरीब सदनिकाधारकांची फसवणूक केली. परिणामी तक्रारदाराने 2024 मध्ये मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आणि न्याय मागितला.



न्यायालयाने स्पष्ट सांगितले की सदर इमारत पूर्णतः अनधिकृत असून त्वरित पाडावी लागेल. या प्रकरणात ठळक बाब म्हणजे शासकीय अधिकाऱ्यांनी अर्थपूर्ण हितासाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं. तक्रारी असूनही कारवाई न करता बिल्डरच्या हातात हात घालून गोरगरिबांची जीवघेणी फसवणूक केली. हा गुन्हा असूनही बघ्याची भूमिका घेतलेल्या अधिकाऱ्यांच्या निर्णय क्षमतेचा सर्वोच्च नमुना ठरतो. त्यामुळे उरणमध्ये अनधिकृत इमारतींचं पसरत असणारे जाळे म्हणजे'बिहार मॉडेल'कडेसुरु असणारी वाटचाल असल्याचे सुज्ञनागरिकांचे म्हणणे आहे. उरण शहरात आज अनधिकृत इमारती, कंटेनर यार्ड, ढाबे, गॅरेज, भंगार माफिया, फेरीवाले, हातगाड्या आदींनी Aलॉबीने उरणवर वर्चस्व मिळवलं आहे. त्यामुळे उरणमध्ये अनधिकृत इमारतींचं पीक! आणि 'बिहार मॉडेल'कडे तालुक्याची वाटचालसुरु असून हप्ता दिला की कोण कारवाई करणार ? अशी सरळ सरळ कोल्हेकूई सुरु असल्याची असल्याची चर्चा नाक्या नाक्यावर खमंग पणे सुरु आहे.? या अनधिकृतपणे सुरु असणाऱ्या बेकायदेशीर धंद्यांमागील लोक सरळ सरळ सांगतात. "आम्ही प्रशासन आणि राजकारणी नेत्यांना हप्ता देत असल्याने आमच्यावर कुणी कारवाई करणार नाही, ही खुलेआम व्यवस्था पायदळी तुडवण्याची कबुली देत असल्याने उरणतालुका आणि विशेष उरण शहर हे 'गुन्हेगारी संरक्षित क्षेत्र' बनवतेय? उरण तालुका मराठी पत्रकार संघ तसेच अनेक सामाजिक संघटनांनी या बेकायदा व्यवसाया विरोधात अनेक वेळा लेखी तक्रारी, पत्रकार परिषदा, वृत्तपत्रात प्रसिद्धी केली. पण तरीही शासन-प्रशासनाकडून कारवाई ऐवजी शांततेचं पांघरूण घालण्यात येत आता फक्त तोडफोड नाही, तर दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा! असा पत्रकार संघांचा संतप्त आवाज! उरण तालुक्यात घुमतोय उच्च न्यायालयाने इमारत पाडण्याचे आदेश दिले असले, तरी गुन्हा करणाऱ्या बिल्डरसोबतच, गुन्हा लपवणारे अधिकारीही जबाबदार असल्याने. त्यांच्यावरही फौजदारी गुन्हे दाखल करावेत. नोकरीवरून बडतर्फ करावं, हप्तेखोरीच्या मालमत्ता जप्त कराव्यात अशी कारवाई जनतेला अपेक्षित आहे.आणिउरण तालुका मराठी पत्रकार संघाची मागणी ही आहे.

## बदनामीच्या भीतीपोटी विवाहित महिलेची कारंजा शहरात आत्महत्या दोन जणांवर गुन्हा दाखल.!



**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

**कारंजा :-** कथित प्रियकराने शारीरिक संबंधाची व्हिडिओ चित्रफित व्हायरल करण्याची धमकी दिल्याने बदनामीच्या भीतीपोटी 40. वर्षीय विवाहित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली.या प्रकरणी 4.जुलै रोजी दोन जणांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कारंजा शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अफसानाबी सय्यद युनूस रां (शाहीन कॉलनी.)असे आत्महत्या करणाऱ्या महिलेचे नाव आहे.तिचे शेख मोबिन शेख वाजीद नामक कथित प्रियकराशी अनैतिक संबंध होते. विशेष म्हणजे.त्यांनी दोघांमधील खाजगी क्षणाची एक व्हिडिओ चिव्रिफत तयार केली होती.आणि त्याद्वारे तो महिलेला शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडत होता.या त्रासाला महिला कंटाळली होती.मात्र कथित प्रियकराने माझ्याशी शारीरिक संबंध ठेव नाहीत व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करू.अशी धमकी दिली.तर त्याने व त्याच्या लहान भावाने संबधित महिलेला पोलिसात तक्रार दिली तर जीवाने मारण्याची धमकी दिली होती.अखेर सततच्या या त्रासाला कंटाळून विवाहित महिलेने स्वतः च्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. हि घटना 4.जुलै रोजी पहाटे 5.वाजताच्या सुमारास उघडकीस आली.या प्रकरणी महिलेचा पती सय्यद युनूस सय्यद गफुर वय 45. वर्ष शाहीन कॉलनी कारंजा यांच्या फिर्यादीवरून कथित प्रियकर शेख मोबीन शेख वाजीद.वय 38.वर्ष . व त्याचा भाऊ शेख अमीन शेख वाजीद.वय 35.दोघेही रा. (दाईपुरा कारंजा.)यांच्या विरुद्ध कलम108.351.352.भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी यातील आरोपी शेख अमीन शेख वाजीद.यास अमरावती येथून अटक केली असून दुसरा आरोपी पसार आहे.घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक दिनेश चंद्र शुक्ला.यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक ठाकरे करत आहेत.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# कोंबडं घ्या, पण जलजीवनचे पाणी द्या' आष्टीत मनसेचे अनोखे आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :**
**- मारुती सत्रे**

दि. (७) : आष्टी तालुक्यात जलजीवन मिशनमार्फत नळयोजनांची सुरू असलेली कामे गेल्या चार वर्षांपासून अर्धवट अवस्थेत असून कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च होऊनही नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. जलजीवनची अर्धवट कामे पूर्ण करून नागरिकांना पाणी मिळावे याकडे लक्ष वेधण्यासाठी मनसे शेतकरी सेनेचे कैलास दरेकर यांनी सोमवारी (दि. ७) पंचायत समिती कार्यालयात 'कोंबडं घ्या, पण जलजीवनचे पाणी द्या' हे अनोखे आंदोलन करण्यात आले. जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर जल' ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महात्वाकांक्षी योजना आहे. आष्टी मतदारसंघातील आष्टी, पाटोदा व शिरूर कासार या तीन तालुक्यांतील गावांना कोट्यावधी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सततच्या दुष्काळी परिस्थितीने होरपळणाऱ्या जनतेला विशेष करून महिला व वयोवृद्ध नागरिकांना या योजनेचा मोठा फायदा होणार असून भारत निर्माण योजना, स्वजलधारा योजना, जलस्वराज्य, राष्ट्रीय पेयजल योजना, मुख्यमंत्री पेयजल, योजना, प्रधानमंत्री पेयजल योजना यासारख्या विविध योजनांवर शेकडो कोटींचा निधी खर्च होऊनही अधिकारी व कंत्राटदारांच्या संगनमताने निकृष्ट कामांमुळे वर्षानुवर्षे डोक्यावर असलेला हंडा उतरण्यास तयार नाही. जलजीवन मिशन योजनेअंतर्गत आष्टी तालुक्यातील 172 गावे, पाटोदा तालुक्यातील 90 गावे व शिरूर



तालुक्यातीलही अनेक गावांत ही योजना राबविण्यासाठी निविदा प्रक्रिया पार पडून प्रत्यक्ष कामांना सुरवातही धुमधडाक्यात करण्यात आली आहे. मात्र, कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या अभद्र युतीमुळे इतर राबविण्यात आलेल्या योजनांप्रमाणे या योजनेतही मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार करण्यात आले असून गेल्या चार वर्षांपासून जवळपास सर्वच योजना अर्धवट अवस्थेत ठेवून मागील योजनांप्रमाणे या योजनेतही भ्रष्टाचार करण्याचे मनसुबे कंत्राटदार व अधिकाऱ्यांकडून बाळगले जात आहेत. आष्टी तालुक्यातील 172 पैकी 44 कामे तसेच पाटोदा तालुक्यातील 90 पैकी 27 कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली व पाटोदा तालुक्यातील 5 कामांची यशस्वी चाचणी घेण्यात आली असल्याचे दाखविण्यात आले आहे. मात्र, अद्यापपावेतो कोणत्याही गावाला या योजनेमार्फत पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला नसल्याने ग्रामस्थांसाठी कोट्यावधी रूपयांची ही जलजीवन योजना मृगजळच ठरली असल्याचे दिसून येत आहे. कार्यारंभ आदेशानंतर चार वर्षांचा कालावधी लोटूनही अद्याप या योजनेमार्फत सुरू असलेली कामे पूर्णत्वास गेलेली नसून मुदतवाढीचे प्रस्ताव थातूरमातूर कारणे दाखवून मोठ्या आर्थिक उलाढालीतून मंजूर करण्यात आलेले आहेत अथवा तशा हालचाली सुरू आहेत. आष्टी मतदारसंघातील सर्वच कामांमध्ये निविदा प्रकिया राबविण्यापासून मोठ्या प्रमाणावर गोलमाल करण्यात आलेला आहे. एकाच कंत्राटदारांना 20 ते 25 कामे देण्याचा महाप्रताप करण्यात आलेला आहे. अद्यापपावेतो ही योजनाही कागदोपत्रीच सुरू असून याचा नागरिकांना कोणताही लाभ झालेला नाही. त्यामुळे कार्यारंभ आदेशामध्ये कंत्राटदारांना घालून देण्यात आलेल्या अटी व शर्तीप्रमाणे कंत्राटदारांवर 10 टक्के दंडात्मक कारवाई करण्यात येणे गरजेचे व आवश्यक आहे.

कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करून त्यांना सहाय्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करावेत. यासह आष्टी तालुक्यातील जनतेला तातडीने जलजीवन योजनेचे पाणी नळाद्वारे मिळावे यासाठी सोमवारी (दि. 7) अनोखे आंदोलन करण्यात आले. दरम्यान, जलजीवन योजनेत आष्टी मतदारसंघात झालेल्या गैरप्रकारांकडे लक्ष वेधण्यासाठी कैलास दरेकर यांनी पोतराजाचा वेश परिधान करून आष्टी शहरातून हलगी, संबुळं व ताशाच्या गजरात सवाद्य मिरवणूक काढत पंचायत समितीमध्ये जावून अधिका-यांना आखाड महिन्यातील कोंबड्यांची भेट दिली. या आंदोलनाची चर्चा दिवसभर सुरू होती.

## ईरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी

**-दैनिक युवक आधार.**
**प्रतिनिधी योगेश पालोदकर**
**सिल्लोड तालुका प्रतिनिधी**

सिल्लोड :ईरा इंटरनॅशनल स्कूल सिल्लोड मध्ये आषाढी एकादशीचा पवित्र सण पारंपरिक पद्धतीने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी वारकरी वेष धारण करून 'ज्ञानोबा माऊली', 'तुकाराम महाराज' यांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होत भक्तिरसात न्हालेलं वातावरण निर्माण केलं. कार्यक्रमाची सुरुवात भगवान विठ्ठल आणि रुक्मिणी मातेच्या प्रतिमेची पूजा करून करण्यात आली. नंतर विद्यार्थ्यांनी अभंग, गवळणी, आणि कीर्तन सादर केले. 'माऊली माऊली' च्या गजरात शाळेचा परिसर भक्तिमय झाला. पालखी



सोहळा शाळेच्या प्रांगणातून मिरवणूक स्वरूपात काढण्यात आला. यावेळी शाळेचे संचालक उत्तमराव पाटील गव्हाणे सर यांनी विद्यार्थ्यांना या उत्सवामागील अध्यात्मिक व सांस्कृतिक महत्त्व पटवून दिलं. त्यांनी सांगितलं की, "अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये भारतीय संस्कृतीची जाणीव निर्माण होते आणि त्यांच्यामध्ये नैतिक मूल्यांचा विकास होतो." या कार्यक्रमात शाळेचे अध्यक्ष गजानन गव्हाणे सर, सचिव सिद्धेश्वर आहेर सर, मुख्यध्यापिका डिसोझा मँडम, शिक्षक, पालक, आणि शाळेतील सर्व कर्मचारी वर्ग मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

# आषाढी एकादशीनिमित्त जोगेश्वरी पूर्व येथील उत्साहात दिंडी यात्रा आणि पूजा

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख.**

जोगेश्वरी, दि. ६ जुलै – सेवाभारती कोकण प्रांत ट्रस्ट (महाराष्ट्र भाग) संचालित 'माता बाल आरोग्य आहार प्रकल्प' अंतर्गत गांधीनगर बी वॉर्ड, जोगेश्वरी पूर्व येथे आषाढी एकादशी निमित्त विविध धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन श्री साई सिद्धी मंडळाच्या परिसरात करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात संघटन मंत्रांनी झाली. त्यानंतर विठ्ठल-रखुमाई व भारतमातेच्या प्रतिमांची विधीवत पूजा, भजन व आरती करण्यात आली. उपस्थित लहानग्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून निलकंठेश्वर मंदिर, राम मंदिर आणि हनुमान मंदिर येथे दर्शन घेतले. नंतर रंगीत व सुसज्ज दिंडी यात्रा काढण्यात आली. शेवटी सर्वांना प्रसाद म्हणून केळी वाटप करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अनंत राऊत होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यकर्ती साक्षीका संजय प्रियोळकर यांचे विशेष योगदान लाभले. तसेच, श्री साई सिद्धी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र केळकर, सचिव विवेक दळवी, शिवाजी सुर्वे, उदय मोरे, दीपिक गोहिल, योगिता वाघमारे, संस्कृती फणसे, सोनू चव्हाण, दीपिका ठाकूर, जान्हवी पेठावे, पिंकी परमार, सलोनी विचले यांच्यासह वस्तीतील अनेक महिला व पुरुष मंडळींनी परिश्रम घेतले. या धार्मिक उत्सवामुळे वस्तीमध्ये भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. लहानग्यांचा सहभाग विशेष आकर्षण ठरला.



## रेशन दुकानदारांकडून ग्राहकांची फसवणूक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची कारवाई करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश पालोदकर**
**सिल्लोड तालुका प्रतिनिधी**

**सिल्लोडः** तालुक्यातील रेशन दुकानदाराकडून शिधापत्रिका धारकांची तसेच शासनाची फसवणूक सुरू असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष श्री राहुल कुमार ताठे यांनी केला असून अशा रेशन दुकानदारांवर धडक कारवाई करण्याची मागणी निवेदनामार्फत तहसीलदार यांना केली आहे.

तालुक्यातील रेशन दुकानदारांवर मासिक साठा/ साप्ताहिक साठा यांचे फलक असणे, निश्चित वेळेत दुकान सुरू ठेवणे, इ पोज मशीन चा वापर करून शिधापत्रिका धारकांना पावती देणे, अंगठा घेऊन राशन न देणे, काळा बाजारात विक्री करणे, धान्य घेतल्याचे रजिस्टर ओपन न ठेवणे आदी नियमाची पायमल्ली सर्रासपणे सुरू आहे,हा प्रकारा अतिशय गंभीर असून ग्राहकांच्या टाळूवरचं लोणी खाण्याचा प्रकार आहे.यावर तातडीने कारवाई करावी अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी स्टाईलने आंदोलन केले जाईल असा इशारा देण्यात आला आहे, निवेदनावर प्रा राहुलकुमार ताठे, शंकर मानकर, दिगंबर गोरे, पांडुरंग बडक, उत्तम ताठे, दादाराव पांढरे, शाकीर पठाण, शेख सरफराज आदींच्या सह्या आहेत.



# चिखली (व) ते सरई रोडची खड्यांनी झाली दुर्दशा

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-**
**जितेंद्र खोडे**

राळेगावः- तालुक्यातील चिखली (व) ते सरई रस्त्याची सध्याची स्थिती अत्यंत खराब आहे आणि रोडच्या कडेला असलेल्या मोठमोठी झाडे ही रोडवर आली आहे त्यात वळण रस्त्यावर झाडानी पूर्ण मोड झाकली आहेत, रस्त्यावर खड्डे पडले असून, डागडुजी नसल्यामुळे वाहनचालकांना आणि




नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.रोज शाळेच्या बस,दुधाची गाडी इत्यादी गाड्यांचा आद्र असल्यामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे,चिखली ते सरई रस्त्याची सध्याची स्थिती खूपच वाईट आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे वाहनचालकांना प्रवास करणे अत्यंत धोकादायक झाले आहे.रस्त्याची दुरुस्ती करण्याची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे, नागरिकांना या समस्येचा सामना करावा लागत आहे. खड्ड्यांमुळे रस्त्यावरुन प्रवास करणे नागरिकांसाठी त्रासदायक झाले आहे. विशेषतः पावसाळा सुरू झाल्याने खड्ड्यांमध्ये पाणी भरल्यामुळे वाहनचालकांना खड्याचा अंदाज येत नसून गाडी घसरून अपघात होण्याची शक्यता आहे,चिखली ते सरई रस्त्याची दुरावस्था झाल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.तातडीने प्रशासनाने लक्ष वेधून दुरुस्तीची मागणी चिखली (व) आणि सरई येथील स्थानिक नागरिकांनी केली आहे तसेच वाहनचालकांनी सुद्धा रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी अशी मागणी करत आहेत.

## सवना ते वाकोडी रस्त्याची दुरावस्था विद्यार्थी, नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**
**प्रसाद हनवते**
**सर्कल प्रतिनिधी सवना**



सवनाः सवना ते वाकोडी या ४ किमी रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. सध्या पावसाचे दिवस असल्याने या मार्गावरून प्रवास करतांना शालेय विद्यार्थी तसेच नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.नुकताच पावसाळा सुरू झाला आहे. सवना गावातुन जात असलेल्या सवना ते वाकोडी या ४ किमी अंतर असलेल्या या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर चिखलांचे साम्राज्य पसरले आहे. तसेच खड्डे मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याने या मार्गावरून ये जा करनाऱ्या नागरिक , वाहन चालक तसेच शेकडो शालेय विद्यार्थ्याना प्रचंड यातना सहन कराव्या लागत आहेत. याबाबत वाकोडी येथील नागरिकांनी अनेक वेळा निवेदन दिले मात्र आजपर्यंत याचा काहीही उपयोग झाला नसल्याची खंत त्रस्त नागरिकांनी व्यक्त केली आहे. सवना गावातून जात असलेल्या या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करन्यात आल्याने शालेय विद्यार्थ्याना घेऊन जानारी एसटी बसला अडथळ्यांची शर्यत पार करावी लागत आहे.याबाबत संबंधीत विभागाने वाकोडीवासीयांच्या या गंभीर समस्येबाबत दखल घ्यावी अशी मागणी करण्यात येत आहे

## विद्या मंदिर ( जि. प. ) सावर्डे येथील विद्यार्थ्यांच्या बालदिंडीचे सर्व ग्रामस्थांनी कौतुक भरल्या नजरेने केले स्वागत"



**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी**

**रघुनाथ देवकर** -कोल्हापूर जि प अंतर्गत पन्हाळा पं. स. मधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विद्यामंदिर सावर्डे येथील विद्यार्थ्यांची मुख्याध्यापक सुरेश गोरडे सर, सयाजी पाटील सर, कविता माळी मॅडम, शितल जगदाळे मॅडम, मयुरी देवकर- जाधव मॅडम यांनी व्यवस्थापन समितीच्या व ग्रामस्थांच्या सहकार्यातून आषाढी एकादशीचे औचित्य साधून बाल बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या बालदिंडीची सुरुवात विद्यामंदिरापासून करण्यात आली गावागावांमध्ये ही दिंडी ज्ञानोबा तुकारामाच्या जयघोषात टाळ मृदुंगाच्या गजरात आनंदाने नाचत बागडत तसेच फुगड्या रिंगण अशा प्रकारचे करमणुकीचे कार्यक्रम करत सावर्डे गावातून भक्तीमय वातावरण करीत या दिंडीचा प्रवास केला. दिंडीचे ग्रामस्थांनी कौतुक भरल्या नजरेने अभिनंदन व कौतुक केल्याचे समजते. या विद्यामंदिराचा नेहमीच सांस्कृतिक धार्मिक सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभाग असतो त्याप्रमाणेच आज रोजी या ठिकाणी बालदिंडीच्या कार्यक्रमाने ही मोठी रंगत आणल्याचे बोलले जात आहे.

# केळवणे येथे डॉ. निशिगंधा देविदास शिवकर यांच्या श्रीदत्त डेंटल क्लिनिक'चे उदघाटन

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/**
**एम.डी.भोईर**

उरण तालुक्यातील केळवणे गावात प्रथमच सर्वसामान्य लोकांच्या सेवेसाठी डॉक्टर डी सी. शिवकर यांची कन्या निशिगंधा शिवकर यांच्या श्रीदत्त डेंटल क्लिनिक चे उद्घाटन सोमवार ७ जुलै ला आगरी मंच पेण चे संस्थापक. अध्यक्ष कै. वाय.एन. म्हात्रे साहेब यांच्या पत्नी गं.भा. यशोदा म्हात्रे यांच्या हस्ते झाले. डॉ. निशिगंधा शिवकर यांनी दंतशल्यविशारद (बी.डी.एस.) ही पदवी "येरला मेडिकल कालेज - वायः एम.टी-मुंबई येथून संपादन केली असून तीन वर्षे मुंबई चर्चगेट येथील जी.डी.सी. डेंटल हॉस्पीटल (सेंट जॉर्जेस)




या सरकारी डेंटल हॉस्पिटल तसेच खाजगी हॉस्पीटलमध्ये अनुभव घेतल्यानंतर आपल्या ज्ञानाचा, आपल्या गावाला लाभ व्हावा, खेड्यातील लोकांना कमी दरात उत्तम सुविधा मिळावी म्हणून सर्व सुविधांनी युक्त असा दातांचा दवाखाना उघडण्याचे ठरविले.

वैद्यकशास्त्राचे उच्च शिक्षण घेतलेले डॉक्टर खेड्यात दवाखाना चालवण्यास फारसे उत्सुक नसतात मात्र सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या वडिलांप्रमाणेच समाजकार्यासाठी डॉक्टर निशिगंधा यांनी ते धाडस केले, म्हणून सर्व स्तरातून तिचे कौतुक होत आहे , या डेंटल क्लिनिकमध्ये...

डिजिटल एक्सरे
रुट कॅनल ट्रीटमेंट
दात काढणे
मशीन व्दारे दात साफ करणे
कृत्रिम दात बसवणे (कायमचे/ तात्पुरते
कवळी बसविणे
कंपोझिट/कॉस्मेटिक फिलींग (दाताच्या रंगाची फिलींग)
हिरड्यांच्या आजाराची ट्रिटमेंट
लहान मुलांच्या दातांची ट्रिटमेंट-
अक्कल दाढ काढणे.
वेडे वाकडे दात सरळ करणे.
इम्लांट
ब्लिचींग

अशा विविध सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

सदर उद्घाटन सोहळ्यास सरपंच गुरुराज ठाकूर, ग्राम. सदस्य कुमार पाटील,हिराजी शंकर शिवकर , ह. भ.प. सदाशिव जाना शिवकर, वि.ना. कोळी गुरुजी,अनंत माळी,डॉ. योगेश म्हात्रे.संजय पाटील आदी मान्यवर उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवून डॉ.निशिगंधा शिवकर यांना शुभेच्छा दिल्या.

## पिलीव येथे मोहरमनिमित्त ताबूतांची (डोले) मिरवणूक शांततेत व धार्मिक वातावरणात संपन्न"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी**

**रघुनाथ देवकर** -मौजे पिलीव ता माळशिरस या ठिकाणी जामा मशिदीच्या पुढाकाराने व मानाच्या सारवान गल्लीतील अलहुशानी मशिदीच्या मानकरी सय्यद कुटुंबीयांच्या वतीने "मोहरम निमित्त"ताबूतचे डोले यांची पिलीवच्या मुख्य पेठेतून वाजत गाजत लढाई सदृश्य समूह नृत्य करीत मिरवणूक काढून धार्मिक पद्धतीने मुस्लिम स्मशानभूमीत ताबूतांचे (डोले) विसर्जन करण्यात आले. मोहरम निमित्त सालाबाद प्रमाणे जामा मशीदचे संचालक मंडळ व सारवान गल्लीतील अलहुशानी मशिदीच्या वतीने सजवलेल्या ताबूतची( डोल्याची )वाजत गाजत समूह नृत्य करीत मिरवणूक काढण्यात आली



होती. सदर मिरवणुकीमध्ये मुस्लिम बांधवांबरोबरच हिंदू बांधवांनी सुद्धा सहभाग नोंदवला होता, त्याचप्रमाणे अनेकांनी या मिरवणुकीमध्ये सहभागी होऊन दर्शनाचा अलभ्य लाभ घेतला. मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस डिपार्टमेंटच्या स्टाफने चोख बंदोबस्त ठेवला होता. सदर मिरवणुकीच्या वेळी मुस्लिम समाजातील सर्व तरुण मंडळींनी परिश्रम घेतले.

# बोगस मृत्यूपत्र; ६ लाख ७८ हजार लाटले

## मंठा पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल, दक्षता पथकाकडून १० जुलैपर्यंत चौकशी

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय प्रतिनिधी**
**:-राजू शिंदे.**

जिवंत व्यक्तीला मयत दाखवून बनावट कागदपत्रे तयार करून बांधकाम कामगारासाठी असलेल्या योजनेत घोटाळा करण्यात आला आहे. बनावट मृत्यू प्रमाणपत्राच्या आधारे ६ लाख ७८ हजारांचे अनुदान लाटले असल्याचे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणी मंठा पोलिस ठाण्यात गुन्हा दालख करण्यात आला आहे. यामुळे बोगस कामगारांत खळबळ उडाली असून, दलालांचे धाबे दणाणले आहे.

**दरम्यान, कामगार उपायुक्त गावंडे**
यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंठा तालुक्यातील आकणी येथील स्वाती शिवाजी उबाळे, देवराव नारायण बदर, दुर्योधन रामभाऊ जाधव तीन व्यक्तीच्या कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी फिर्यादी व सोबत दक्षता पथकातील कर्मचारी प्रत्यक्ष गेले असता ग्रामसेवक खेडकर यांनी सांगितले की, वरील तिघेही जण आकणी गावचे रहिवासी नसून त्यांना कार्यलयातर्फे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

**चौकशीतील अधिकारी यांनी दलालांचे धाबे दणाणले**
मंठा शहरासह तालुक्यामध्ये बांधकाम कामगार नोंदणी करण्याकरिता दलालांनी व ऑनलाईन सेवा केंद्र धारकांनी मोठी लूट केली आहे. यात मंठा शहरातील देवी रोडवरील वाटुर येथील एका दलालांनी सेवा केंद्रावर व मंठा शहरातील काही दलाल यांनी जास्तीचे पैसे घेऊन त्यांच्या आधार कार्ड मध्ये फेरबदल करून नोंदणी केली आहे. या सर्व बाबीची चौकशी करण्यात यावी व यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी शहरातील नागरिकांतून होत आहे. मंठा शहरासह तालुक्यात लाखो लोकांची बनावट कागदपत्राआधारे कामगारांची ऑनलाईन नोंदणी करून अनुदान व कामगारांच्या पाल्याची शिष्यवृत्ती अनुदान लाटणाऱ्यांची चौकशी होणार का ? असा प्रश्न सुजाण नागरिक विचारत आहेत. कागदपत्राची पडताळणी केल्यानंतर त्यांच्याशी लक्षात आले की, वरील तिन्ही व्यक्तीचे नातेवाईक यांनी बनावट कागदपत्रे तयार करून शासनाची व मंडळाची दिशाभूल करून मयत कामगाराच्या वारसा देण्यात येणारी अर्थसहाय्य रक्कम सहा लाख ७८ हजार रुपये लाटले आहेत. हे नातेवाईक व दलालांनी ग्रामपंचायतचे सही व शिके बोगस वापरून ही दिशाभूल करत मोठा भ्रष्टाचार केला आहे. या प्रकरणी मंठा पोलिसात शिवाजी लक्ष्मण उबाळे कमल देवराव बदर, तेजस दुर्योधन जाधव यांच्या विरोधात मंठा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार संतोष माळगे तपास करत आहेत. या संदर्भात या प्रकरणी दक्षता पथकातील छत्रपती संभाजीनगर येथील सरकारी कामगार अधिकारी गोविंद गावंडे यांच्या फिर्यादीवरून मंठा पोलिस ठाण्यात गुरूवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिवसेना विभागप्रमुख दिलीप मामा लांडे यांच्या हस्ते आषाढी एकादशी निमित्त फराळ वाटप

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,(केतन भोज)**

;दरवर्षी प्रमाणे यंदाही देवशयनी आषाढी एकादशी निमित्त कार्यसम्राट आमदार व शिवसेना विभागप्रमुख दिलीप मामा लांडे यांच्या हस्ते घाटकोपर पश्चिम येथील सर्वोदय विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भाविकांसाठी खिचडी,फळ व प्रसाद वाटप करण्यात आले.तसेच यानिमित्त कीर्तन सोहळ्याचे देखील आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला उपविभागप्रमुख हरेश अण्णा धांद्रूत,महिला विधानसभा प्रमुख संगीताताई हुले,शाखाप्रमुख नंदू मोरे,विजय कोईलकर,मंगेश भोर,मनीष कळंबे तसेच घाटकोपर शिवसेनेचे सर्व महिला व पुरुष पदाधिकारी,कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे नियोजन हरेश अण्णा धांद्रूत व नंदू मोरे यांच्याकडून करण्यात आले होते.



# शिरूरआनंतपाळ नगर पंचायत आध्यक्षपदी चंद्रकला शिवणे तर

## आनंत काळे यांची उपनगर अध्यक्षपदी बिनविरोध निवड.

**दैनिक युवक आधार**
**प्रविण तांबोळकर**
**शिरूर अनंतपाळ :**

येथील नगरपंचायतच्या नगरआध्यक्ष व उपनगरआध्यक्ष पदाच्या निवडीसाठी उपविभागीय अधिकारी तथा पिठासन अधिकारी शरद झाडके यांच्या उपस्थित सोमवारी नगरपंचायतच्या सभागृहात विशेष सभा घेण्यात आली.यावेळी नगररआध्यक्ष व उपनगरआध्यक्ष पदासाठी प्रत्येकी एकच नामांकन-पत्र दाखल झाले. त्यामुळे नगरआध्यक्षपदी चंद्रकला शिवणे तर उपनगरआध्यक्षपदी अनंत काळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी नुतन नगरआध्यक्ष



व उपनगरअध्यक्षांचा सभाग्रहात सत्कार करण्यात आला. शिरूर अनंतपाळच्या नगरअध्यक्षा मायावती धुमाळे यानी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयकाकडून उपविभागीय अधिकारी तथा पिठासन अधिकारी शरद झाड़के यांच्या उपस्थितीत सोमवारी नुतन नगरआध्यक्ष व उपनगरअध्यक्षाच्या निवडीसाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २ जुलै रोजी नगरआध्यक्ष पदासाठी केवळ चंद्रकला शिवणे यांचा एकमेव अर्ज आला होता. तर ७ जुलै रोजीच्या विशेष सभेत उपनगरअध्यक्ष पदासाठी सुध्दा अनंत काळे यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे नगरअध्यक्षपदी चंद्रकला शिवणे यांची तर उपनगरअध्यक्षपदी अनंत काळे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.यावेळी नगरपंचायत कार्यालयच्या वतीने नुतन नगरअध्यक्ष व उपनगरअध्यक्षांचा फेटाबांधुन व शालश्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी पिठासन अधिकारी शरद झाड़के, नगरपंचायतचे मुख्याधिकारी रोहित आरबोळे, भाजपाचे मा.ता. अध्यक्ष मगेंश पाटील, माजी सभापती धोंडीराम सांगवे, रतन शिवणे,नगरसेवक सुधीर लखनगावे, नगरसेवक ओम बर्गे, माजी नगरअध्यक्षा मायावती धुमाळे, सुषमा मठपती,रागिणी शिवणे,शामल शिंदे,जयश्री आवाळे,कुसुम खरटमोल, राजनंदीनी तांदळे,जगदेवी सुगावे,बळीराम लोहार,अरविंद चव्हाण,शेषेराव मुमाळे,यासह अनेकांची उपस्थिती होती. नवीन नगरअध्यक्ष उपाध्यक्षांनी पक्षीय राजकारण न करता शिरूरआनंतपाळ शहरातील पाणी टंचाई, आठवडी बाजारात बाहेरगावाहून येणाऱ्या व्यापाऱ्यांना बसण्यासाठी जागा ऊपलब्ध करुन देऊन शहर स्वच्छता मोहीम राबवावी अशी इच्छा नागरिकांनी व्यक्त केली.

# आषाढी एकादशीच्या निमित्त अनसिंग येथे सातव लॉनमध्ये उसळ वाटप

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

येथील सातव लॉनमध्ये आषाढी एकादशीच्या निमित्ताने सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल माणिक सातव व त्यांचे बंधू संदिप सातव यांनी पांडूरंगाचे चरणी भक्ती अर्पण करीत संत परंपरेचा उजाळा देत विठुरायाचे भाविक भक्ताकरीता उसळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले होते.यावेळी सातव लॉनमध्ये भाविक भक्ताचे दर्शनासाठी विठु माऊलीची मुर्ती ठेवण्यात आली होती तीची सर्वप्रथम विठ्ठल सातव व त्यांच्या मातोश्री बेबीताई सातव यांचे हस्ते विधीवत पूजाअर्चा करण्यात आली व भाविक भक्तांच्या उत्स्फूर्त प्रतिसादत भक्तीमय वातावरणात आपुलकीने



भरलेल्या फराळरुपी प्रसाद म्हणून उसळ वाटप करण्यात आला या उसळ रूपी महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी हजारो च्या संख्येत भाविक भक्तांचा जनसागर उसळला होता या प्रसंगी मंगलमय प्रसंगी भाविक भक्तां बरोबरच अनसिंग येथील पोलीस ठाण्याचे ठाणेदार अमर चौरेसह त्याचा कर्मचारीवर्ग तसेच सामाजिक कार्यकर्ते नथ्थूजी कापसे,बालू माल शरद रोकडे किशोर सारडा , श्रीराम कापसे, गणेश बियाणी ,यश चव्हाण अशा अनेक मान्यवरांनी फराळाचा आस्वाद घेतला व ही आमच्यासाठी मोठी आनंदाची बाब ठरली असे उद्गगार काढून भक्तीमय सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या सातव परिवाराचे आभार मानले पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.तसेच आषाढी एकादशीचे औचित्य साधून येथील विठ्ठल मंदिर,चोळातील महादेव मंदिर,प्रभाग क्रं. चारमधील मारोती मंदिर,श्री. शृंग ऋषी महाराज मंदिर अशा अनेक ठिकाणी उसळ वाटप करण्यात आला.

# उरणकरांचा अभिमान : विघ्नेश कोळी यांचे सी.ए.च्या परिक्षेत उत्तुंग यश!

**दैनिक युवक आधार**
**कॉलेज कट्टा/आरती सुरवसे**

6 जुलै २०२५रोजी घोषित झालेल्या चार्टर्ड अकाउंटंट (CA) फायनल परीक्षेच्या निकालात उरण तालुक्याच्या विघ्नेश कोळी यांनी अत्यंत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तत्कालीन रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेली अभ्यासिकेत उरण नगरपालिका संचलित मॉ साहेब मीनाताई ठाकरे वाचनालयाचे विद्यार्थी असलेल्या विघ्नेश कोळी, रा. करंजा – उरण. यांचा हा प्रवास केवळ वैयक्तिक नाही, तर संपूर्ण उरणसाठी प्रेरणादायी ठरला आहे. त्यांनी मिळविलेल्या या यशामुळे संपूर्ण तालुक्य मधून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वाचनालयात अभ्यास करणारा, ध्येयवेडा, आणि शिस्तप्रिय विद्यार्थी म्हणून ओळखला जाणारा विघ्नेश अनेक दिवसांचे अथक परिश्रम आणि संयम यांचं प्रतीक ठरला आहे. गरिबी, अडथळे आणि मर्यादांवर मात करून त्याने हे यश मिळवलं आहे.वाचनालयातील मित्रांनी आणि मार्गदर्शकांनी याचा आनंद साजरा करताना भावनांनी भरलेली प्रतिक्रिया दिली. "विघ्नेशने दाखवून दिलं की ग्रामीण भागातल्या मुलांनाही मोठं स्वप्न पाहण्याचा आणि ते पूर्ण करण्याचा अधिकार आहे," या यशामध्ये उरण नगर परिषद प्रशासनाने केलेले सहकार्य हे देखील अधोरेखित करण्यासारखे आहे असं वाचनालयाचे ग्रंथपाल श्री. संतोष पवार आणि अड निरंतर सावंत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विघ्नेश आता समाजासाठी काम करण्याची इच्छा बाळगतो आणि आर्थिक साक्षरता वाढवण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. यावेळीउरण तालुक्याचा हा तेजस्वी चेहरा–सीए विघ्नेश कोळी–याच्या पुढील प्रवासासाठी उपस्थितांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



# सिल्लोड :- "श्रावणात मृदू पावसाची सर आणि हृदयात विठू माऊलीचा गजर"

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**तालुक्यातील**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेफळ, केंद्र आमठाणा शाळेत आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थीरुपी वारकऱ्यांची वारी जणू साक्षात पंढरपूराची वारीच अवतरली. विद्यार्थ्यांनी साकारल्या संत ज्ञानेश्वर, निवृत्ती, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, तुकाराम यांच्या वेशभूषा. विद्यार्थीरुपी वारकऱ्यांच्या रुपात पावले मंत्रमुग्ध झाली. आणि गजर झाला– "ज्ञानोबा–तुकाराम...." भगवे झेंडे, तुळशीच्या रोपांची पालखी, कळस व मृदंगाच्या गजरात निघालेली ही वारी, गावकऱ्यांच्या आणि पालकांच्या



उपस्थितीत एक आध्यात्मिक सोहळा बनली. फुगड्यांच्या फेऱ्या, नृत्यातील नाद आणि अभंगांच्या गूंजनांनी अवघा शालेय परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. दिंडीची सांगता शाळेच्या प्रांगणात झाली.यावेळी गावातील अबालवृद्ध, विद्यार्थी, माता, शिक्षकवृंद, यांनी संगीताच्या तलावर ठेका धरत फुगडी खेळण्याचा मनमुराद आनंद घेतला. अशा प्रकारे "वृक्ष दिंडीचे" समापन झाले.
या "वृक्ष दिंडी" च्या वारीची तयारी सर्व शिक्षक, मुख्याध्यापक व ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे यशस्वी झाली. विशेष म्हणजे, याच वारीमध्ये विद्यार्थ्यांनी हातात छोटे रोपं, ओठांवर पर्यावरण गीत आणि अंतःकरणात हरित संकल्प, जिच्यात पर्यावरण संवर्धनाचा संदेश रुजलेला होता. याप्रसंगी "वृक्ष दिंडी" त शाळेच्या वतीने विविध प्रकारचे १५० वृक्ष "एक पेढ माँ के नाम" या उपक्रमांतर्गत शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने लागवडीचा आणि जतन करण्याचा दृढ संकल्प केला. "माऊली.. माऊली..जय जय रामकृष्ण हरी, निघाली शाळेतून वारी, भक्तिभावाची नितांत खरी!" विठू नामाचा गजर करत, भक्तीच्या पावलांनी पुढे चालत राहूया! साथ देऊ पर्यावरणाची, वृक्षलागवडीची, जीव सृष्टीची !विठ्ठल.. विठ्ठल..जय हरि विठ्ठल! या वृक्ष दिंडीच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य शा.व्य.समिती शिंदेफळ, सरपंच,उपसरपंच,सदस्य ग्रामपंचायत शिंदेफळ, पोलीस पाटील, भजनी मंडळी, शिक्षण प्रेमी नागरिक, सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद जि.प.प्रा. शा.शिंदेफळ या सर्वांचे अनमोल सहकार्य मिळाले.


## रामदास सेवाश्रम ट्रस्ट

रजि.नं.ई-८४४३/ठाणे,
पॉट नं. १६४४, वास्तुकार नगर, कल्याण कर्जत हायवे रोड, वांगणी-२, ता. अंबरनाथ, जि. ठाणे-४२१५०३.
मो.नं.९८५०८७९८२९ / ९४२३१०२७१३
EMAIL ID: PARAGBUVARAMDASHI13@GMAIL.COM

### निविदा सुचना

रामदास सेवाश्रम ट्रस्टतर्फे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता परिसरातील व कीडा संकुलातील १३००० विद्यार्थ्यांकरिता खालीलप्रमाणे वस्तु खरेदी करावयाची आहेत व सेवापूरवठादारांची नेमणूक करावयाची आहे. त्यासाठी ही निविदा सुचना काढण्यात येत आहे.

| अन. | तपशील | संख्या | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | शालेय गणवेश | 16 590 | 7080000 |
| 2 | नाईट गणवेश | 625 | 162500 |
| 3 | स्पोर्ट गणवेश व ट्रॅक सूट | 16000 | 336100 |
| 4 | शालेय टाय बेल्ट | 12 500 | 40700 |
| 5 | स्वेटर रेनकोट | 4250 | 772000 |
| 6 | अंडरगारमेंट्स | 5600 | 292000 |
| 7 | शालेय वह्या | 155950 | 909850 |
| 8 | सायन्स जनरल संगणक पुस्तके व इतर छपाई | 15200 | 330325000 |
| 9 | शालेय पुस्तके बालभारती | 38 हजार | 700 |
| 10 | शालेय पुस्तका एनसीआरटी | 10200 | 740500 |
| 11 | शालेय पुस्तका नवनीत व इतर प्रकाशन | 550000 | 3938000 |
| 12 | शालेय शूज | 6500 | 1699500 |
| 13 | शालेय शूज डीएमएस | 650 | 197500 |
| 14 | स्पोर्ट शूज | २६०० | 863500 |
| १५ | स्लीपर | 3250 | 184500 |
| 16 | शालेय सॉक्स | 22950 | 555000 |
| 17 | मिलिटरी अक्सेसरीज | 2750 | 197500 |
| 18 | टॉवेल रुमाल | 17 300 | 568500 |
| 19 | बेडशीट चादर सोलापूर | 9350 | 980000 |
| 20 | मच्छरदानी | 5100 | 4910000 |
| 21 | इतर वस्तू पॅकेज | 19350 | 590500 |
| 22 | स्कूल बॅग | 2500 | 589500 |
| 23 | स्टेशनरी एक लाख | 33850 | 18072119 |
| 24 | तेल पॅराशुट | 8450 | 154900 |

| अन. | तपशील | संख्या | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| 25 | कोलगेट पेस्ट व टूथब्रश | 75 900 | 1146000 |
| 26 | गोदरेज साबण व वीर साबण | 107600 | 1418000 |
| 27 | सॅनिटरी पॅड | 24050 | 116000 |
| 28 | वॉशिंग पावडर लॉन्ड्री लिक्विड साहित्य | 400 | 36400 |
| 29 | सरपंच जळगाव लाकूड | 10000 | 456500 |
| 30 | हाउसकीपिंग व स्वच्छता साहित्य | 49 250 | 1642000 |
| 31 | कर्मचारी गणवेश | 6000 | 1790500 |
| 32 | सिव्हिल मेंटेनन्स मजुरी दर प्रमाणे काम वार्षिक | | 1750000 |
| 33 | झेरॉक्स मशीन व प्रिंटर दुरुस्ती साहित्यासह मजुरी दराप्रमाणे वार्षिक देखभाल दुरुस्ती रेट कॉन्ट्रॅक्ट | | 250000 |
| 34 | नवीन संगणक व प्रिंटर खरेदी पुरवठा | | 2500000 |
| 35 | आरोप आणि शुद्धीकरण मशीन साहित्य खरेदी | | |
| 36 | ग्रंथालय पुस्तके | | 750000 |
| 37 | सीसीटीव्ही कॅमेरा केबल व दुरुस्ती साहित्य | | 250000 |
| 38 | प्रसादाला करिता आवश्यक किराणा हवे तर साहित्य | | 4000000 |
| 39 | स्कूल बस इतर वाहन स्पेअर पार्ट व दुरुस्तीसाठी पुरवठा दराची नियुक्ती | | 2000000 |
| 40 | शालेय सॉफ्टवेअर व टेक्नॉलॉजी सेवा पुरवठादार | | 7500000 |
| 41 | स्कूल व हॉटेल ऍक्टिव्हिटी उदाहरणार्थ संगीत कला अभिनव इत्यादी क्षेत्रातील सेवा पुरवठ्याची नियुक्ती | | 7500000 |
| 42 | इलेक्ट्रिक मेंटेनन्स व नवीन इलेक्ट्रिक वर्क साहित्य खरेदी व सेवा पुरवठा दराची नियुक्ती स्पोर्ट शूज | | 1500000 |

एकूण 98009069

**एकूण अंदाजे रकम 98009069 मात्र उक्त तक्त्यातील**
**प्रत्येक वस्तूसाठी स्वतंत्र निवेदा फॉर्म भरावा लागेल**
**ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया व निविदा भरण्याची इच्छा ऑनलाईन प्रक्रियेने पूर्ण केल्यावर भरलेल्या निविदा फॉर्म डाउनलोड करून बंद लिफाफ्यात समक्ष सादर करणे अनिवार्य राहील ज्या निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध होणार नाही त्या प्रत्यक्ष खरेदी व भंडार विभाग कार्यालय वागणी जिल्हा ठाणे येथे उपलब्ध होतील.**

अध्यक्ष
रामदास सेवाश्रम शैक्षणिक समिती

सरचिटणीस/अध्यक्ष
रामदास सेवाश्रम ट्रस्ट, वांगणी, जि. ठाणे


# बांधकामापूर्वी रक्कम अदा केल्याप्रकरणी शाखा अभियंता आणि

## कार्यकारी अभियंत्याचे निलंबन - ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

**दैनिक युवक आधार**
**मुंबई. संतोष पाटील**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मौजे लासूर येथील शाळा बांधकाम आणि मौजे गुरुधानोरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकामाच्या पूर्वीच १४७ लाख रुपये ठेकेदाराला अदा करण्यात आले. या प्रकरणाची प्राथमिक चौकशीअंती संबंधित जिल्हा परिषद बांधकाम विभागातील शाखा अभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांचे निलंबन करण्यात आले आहे. या अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी पुढील दोन महिन्यात करण्यात येणार असून यात जे तथ्य आढळेल त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. विधानपरिषद सदस्य सतीश चव्हाण यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता. यात विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, सदस्य अड.अनिल परब, भाई जगताप यांनीही उपप्रश्न विचारला. मंत्री श्री.गोरे म्हणाले की, या बांधकामांदर्भात चौकशी करण्यात आली असून प्रत्यक्षात झालेल्या कामापेक्षा अधिकचे मूल्यांकन मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आले आहे. कामाचे फोटो, टेस्ट रिपोर्ट नसतानाही देयके मंजूर करण्यात आली आहे. यासंदर्भात आदर्श कार्यपद्धती असूनही त्यानुसार ही देयके अदा केली असल्याचे त्यांनी आपल्या उत्तरात सांगितले आहे.


सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# गुइलेन-बॅरे सिंड्रोमशी पिडीत रुग्णाची ९८ दिवसांची मृत्यूशी झुंज यशस्वी

## मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये केले यशस्वी उपचार

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई वार्ताहर**

डॉ. जयेंद्र यादव (न्यूरोलॉजिस्ट), डॉ. अदिती जैन आणि डॉ. विनोद अमृतलाल यादव( इंटेन्सिव्हिस्ट) यांच्या मार्गदर्शनाखाली मेडिकव्हर हॉस्पिटलमधील एका तज्ज्ञांच्या टिमने गुइलेन-बॅरे सिंड्रोमचे निदान झालेल्या ४८ वर्षीय पुरुषावर यशस्वीरित्या उपचार केले. त्याने ९८ दिवस मृत्यूशी झुंज देत ही लढाई यशस्वीपणे जिंकली. आता रुग्ण घरी परतला असून त्याच्या प्रकृतीत सुधारणा दिसून येत आहे. रुग्ण श्री. सतीश माने(नाव बदलले आहे)* याच्या स्नायुंमध्ये कमकुवतपणा आणि सुन्नपणा जाणवू लागला होता.नर्व्ह कंडक्शन व्हेलॉसिटी (NCV) आणि सेरेब्रोस्पाइनल फ्लुइड (CSF) चाचणीनंतर रुग्णाला गुइलेन-बॅरे सिंड्रोमचे (GBS) निदान झाले होते. यामुळे



रुग्णाला त्वरीत आपत्कालीन विभागात दाखल करण्यात आले. डॉ. जयेंद्र यादव( न्यूरोलॉजिस्ट) सांगतात की, गुइलेन-बॅरे सिंड्रोम ही एक दुर्मिळ ऑटोइम्यून स्थिती आहे ज्यामध्ये एखाद्याची रोगप्रतिकारक शक्ती आपल्या नसांवर हल्ला करते. यामुळे स्नायूंमध्ये सुन्नपणा आणि कमकुवतपणा येतो. यामुळे रुग्णाच्या पायांमध्ये सुन्नपणा आणि कमकुवतपणा आला असून अवघ्या 2 दिवसांतच रुग्णाला श्वास घेण्यास त्रास झाला आणि त्याला अतिदक्षता विभागात दाखल करावे लागले. इंट्राव्हेनस इम्युनोग्लोबुलिन (IVIG) चा सुरुवातीचा कोर्स असूनही, त्यांची प्रकृती बिघडली, ज्यामुळे त्यांच्या डायाफ्राम (फुफ्फुसांच्या खाली स्थित, जो श्वसनाचा प्रमुख स्नायू आहे), बल्बर आणि डोळ्यांच्या स्नायूंवर परिणाम झाला. त्यांना प्लाझ्माफेरेसिस सुरू करण्यात आले परंतु लवकरच त्यांना गंभीर ऑटोनॉमिक डिसफंक्शन झाले, ज्यामुळे जीवघेणी परिस्थिती उद्‌भवली, ज्यासाठी कार्डिओपल्मोनरी रिससिटेशन (CPR) आणि तात्पुरते पेसमेकर सपोर्टची आवश्यक भासली. डॉ. जयेंद्र यादव पुढे सांगतात की, रुग्णाला न्यूमोथोरॅक्स (फुफ्फुस कोसळला) देखील झाला होता ज्यासाठी छातीच्या नळीची आवश्यकता होती आणि श्वसन संसर्ग होता जे IV अँटीबायोटिक्सने नियंत्रित केले गेले. 98 दिवसांत, त्याला IVIG आणि फिजिओथेरपी, प्लाझ्मा थेरेपी, अटिबायोटिक्स, विटॅनिन्सचे डोसच्या माध्यमातून उपचार करण्यात आले. अखेर, त्याला व्हेंटिलेटरवरून बाहेर काढण्यात यश आले आणि त्याला तोंडावाटे आहार देण्यास सुरुवात करण्यात आली. 15 फेब्रुवारी रोजी रुग्णाला घरी सोडल्यानंतर, तो स्वतंत्रपणे श्वास घेऊ शकत होता आणि त्याच्या प्रकृतीत सुधारणा दिसून येत होती. हे गुइलेन-बॅरे सिंड्रोमच्या सर्वात आव्हानात्मक प्रकरणांपैकी एक होते जे आम्ही यशस्वीरित्या व्यवस्थापित केले. रुग्णाला श्वसनक्रिया बंद पडणे, ऑटोनॉमिक डिसफंक्शन (जो शरीरीक प्रक्रियांमध्ये व्यत्यय आणतो), श्वसन संक्रमण, सेप्सिस अशी मोठी गुंतागुंत होती. मी मेडिकव्हर हॉस्पिटलमधील संपुर्ण टीमचे आभार मानतो. मी ९८ दिवस आयसीयूमध्ये होतो मात्र मला कधीही एकटे वाटले नाही. मला नवे आयुष्य मिळवून देणाऱ्या डॉ. जयेंद्र यादव आणि त्यांच्या संपूर्ण टीमचा मी कायम ऋणी राहीन अशी प्रतिकिया रुग्ण श्री. माने यांनी व्यक्त केली.

# आदिवासी महिलांचा कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथे अभ्यासदौरा – कौशल्यविकास व उद्योजकतेसाठी सकारात्मक पाऊल

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी.**
**रणजितसिह. ठाकूर**

भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली प्रस्तुत कृषी विज्ञान केंद्र वाशिम येथे मौजे मुसळवाडी, ता. मालेगाव, येथील आदिवासी महिलांच्या अभ्यासदौऱ्याचे आयोजन शनिवार, दिनांक 5 जुलै 2025 रोजी कृषी विज्ञान केंद्र, कारडा येथे करण्यात आले. या अभ्यासदौऱ्याचा मुख्य उद्देश शाश्वत शेती, पूरक व्यवसाय व महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह तांत्रिक प्रशिक्षण देणे हा होता.




महिलांनी कृषी विज्ञान केंद्राच्या कुक्कुटपालन युनिट मत्स्य पालन, परसबागेत भाजीपाला उत्पादन, गांडूळखत निर्मिती केंद्र, तसेच एकात्मिक शेती प्रकल्प यांना भेट देऊन सविस्तर माहिती घेतली. यानंतर शास्त्रज्ञांद्वारे तांत्रिक प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले. यामध्ये केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. रवींद्र काळे, कृषी अर्थशास्त्र विषय विशेषज्ञ डॉ. डी. एन. इंगोळे, पशुविज्ञान विषय विशेषज्ञ श्री. मयूर देशमुख व क्षेत्र व्यवस्थापक श्री प्रमोद देशमुख यांनी महिलांशी संवाद साधून विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

अभ्यासदौऱ्यात सहभागी महिलांनी केंद्रावरील प्रयोगशाळा, कुक्कुटपालन युनिट, मत्स्य पालन, गांडूळखत व बकरीपालन युनिट, आणि एकात्मिक शेती मॉडेल यांचा सखोल अभ्यास केला. महिलांनी विशेषतः घरगुती भाजीपाला उत्पादन, जैविक खते तयार करणे, आणि कुक्कुटपालन व बकरीपालनासारखे लघुउद्योग आपल्या गावात स्वयंसहाय्यता बचत गटांद्वारे सुरू करण्याची तयारी दर्शवली. कृषी विज्ञान केंद्राचे मार्गदर्शन आमच्यासाठी अत्यंत उपयुक्त असून, आम्ही गावपातळीवर उद्योग सुरू करण्यासाठी प्रयत्नशील राहू असे महिलांनी समाधानपूर्वक सांगितले.

हा अभ्यासदौरा आदिवासी महिलांमध्ये कौशल्यविकास, आत्मनिर्भरता व कृषीउद्योजकता वाढवण्यासाठी प्रभावी ठरेल, यामुळे गावपातळीवर स्वरोजगार निर्मितीस नवे दालन खुले होण्यास मदत होईल. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून सौ. कल्याणी अमोल मस्के यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.

# चिपळूणच्या प्रभात रोड ची चाळण

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी**

शहरातील प्रभात रोडची सध्या चाळण झाली आहे.प्रभात रोडच्या मुंबई गोआ महामार्गापासून ते नारायण तलावाकडे जाणाऱ्या रस्त्यापर्यंत चा रस्ता पूर्णपणे उखडला आहे.चिखल पाण्याने खड्डे भरून गेले आहेत.येथून जाणाऱ्या प्रत्येकाला रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता हेच पाहावे लागत आहे. सुमारे ४०० मीटर एवढ्या रस्त्याचे डांबरीकरण यावर्षी न झाल्याने येथील रहिवाशांकडून तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली जात आहे.पावसाळ्यात खड्ड्यात चिखल पाणी तर पावसाळा गेला की येथील रहिवाशांना धुळीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.या धुळीवर साधे पाणी मारण्याचे सौजन्य देखील चिपळूण नगरपरिषद दाखवत नसल्याने येथील नागरिक बेजार झाले आहेत.उन्हाळ्यात तर प्रत्येकाच्या घरात हात लावू तिथे धूळ अशी अवस्था होत असल्याने,शासनाच्या उदासीनतेवर येथील नागरिक पुरते नाराज आहेत. चिपळूण शहरातील अनेक रस्ते सुधारले पण प्रभात रोड च्या या दुरावस्थेकडे शासनाला व तथाकथित लोक प्रतिनिधी ना लक्ष द्यायला वेळ नाही. एखाद्या चारचाकी गाडीचा प्रॉब्लेम नेमका काय आहे हे कच्च्या रस्त्यावर चालवल्यावर कळते,अशा वेळी मेकॅनिक प्रभात रोड चा आधार घेत आहेत.प्रभात रोड ची दुरवस्था सध्या चिपळुणात सर्वश्रुत झाली आहे.मात्र राज्यकर्त्यांकडून व लोकप्रतिनिधींकडून ही गोष्ट नजर अंदाज केली जात आहे. पावसाळ्यात या रस्त्यावरील खड्डे चिखल पाणी साचल्याने दिसायला लागल्यावर यामध्ये गिरीट टाकले जाते. व तात्पुरती मलमपट्टी केली जाते.परंतु गाड्या जाऊन जाऊन ते सगळं पुन्हा खड्ड्यातून बाहेर येत.पावसाळा गेला की सुखलेलं गिरीट रहिवाशांच्या घरात जात. या सर्व गंभीर बाबींकडे प्रशासन लक्ष देणार का असा सवाल उपस्थित केला जात आहे.पावसाळा जाताच या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी केली जात आहे.



# श्री देव विठ्ठल पाचमाडकर मंदिरात आषाढी एकादशी निमित्त भक्तांची वर्दळ

## आमदार शेखर निकम यांचे मंदिरात दर्शन

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**

**चिपळूण (प्रतिनिधी)--** : शहरातील खेंड विभागात असलेल्या १२५ वर्षांपूर्वीच्या ऐतिहासिक श्री देव विठ्ठल पाचमाडकर मंदिराचा जिर्णोद्धार अखेर पूर्ण झाला असून, आषाढी एकादशीच्या विशेष दिवशी मंदिर भक्तांसाठी खुले करण्यात आले. सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची वर्दळ वाढली होती. सर्वत्र भक्तिभावाची लहर दिसत होती. आषाढी एकादशीच्या शुभक्षणी चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांनी मंदिरात येऊन श्री देव विठ्ठल आणि रुक्माईचे दर्शन घेतले. या वेळी मंदिराच्या जिर्णोद्धाराचे कार्य यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल आनंद व्यक्त केला. आमदार शेखर निकम यांचे मंदिरात स्वागत आशिष खातू, सचिन साडविलकर, खजिनदार उदय गांधी यांसह मंदिर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी केले. श्री देव विठ्ठल पाचमाडकर मंदिर मंडळ आणि स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये



भजन संध्या आणि विठू नामाचा जप सुरू होता, ज्यामुळे भाविकांच्या भक्तिभावात आणखी वृद्धी झाली. अन

# स्वप्नील पवार C. A. परीक्षा उत्तीर्ण



**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

रुईछत्तीशी येथील श्री. स्वप्नील निवृत्ती पवार यांनी काल जाहीर झालेल्या C. A. च्या परीक्षेच्या निकालात बाजी मारली असून घवघवीत यश संपादन केले आहे. अतिशय खडतर परिस्थिती तून शिक्षण घेत त्याने हे यश मिळवले असल्याने त्याचे वेगवेगळ्या स्तरातून कौतुक होत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकारी संस्था कार्यालयामध्ये सर्वांना परिचित असणारे ऑडीएटर श्री. निवृत्ती पवार यांचे ते चिरंजीव असून आदर्श शिक्षक श्री. पी. डी. जगताप यांचे ते भाचे आहेत. माझे सी. ए. होण्याचे स्वप्न माझ्या मुलाने पूर्ण केले याचा मला खूप आनंद असून मुलाचा अभिमान वाटतो असे निवृत्ती पवार यांनी सांगितले रुईछत्तीशी ग्रामस्थांच्या वतीने भव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी बोलताना यशाला गवसणी घालण्याचा कानमंत्र स्वप्नील याने विध्यार्थी व पालकांना दिला असून ग्रामीण भागातील विध्यार्थ्यांच्यासमोर आदर्श घालून दिल्याने त्याचे सर्वच क्षेत्रातून कौतुक होत आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जिद्द, चिकाटी, व सातत्याच्या जोरावर हे यश मी संपादन केल्याचे त्याने सांगितले असून या यशाचे संपूर्ण श्रेय हे आई वडील, तसेच वेळोवेळी मार्गदर्शन करणारे मामा श्री. पी. डी. जगताप यांना आहे असे स्वप्नील याने सांगितले.

# बापू शिंदे यांचे नवी दिल्ली येथे बी.एल.ओ.चे राष्ट्रीय प्रशिक्षण संपन्न झाले

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र,कर्नाटक, आंध्रप्रदेश, झारखंड व लडाख या राज्यातील मतदान नोंदणी अधिकारी (बी.एल.ओ.) व पर्यवेक्षक यांच्या करीता आय.आय.आय.डी.ई.एम नवी दिल्ली येथे आयोजित विशेष प्रशिक्षण दिनांक ३ व ४ जुलै २०२५ रोजी भारत निवडणूक आयोगाच्या,भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाकरिता राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय महाराष्ट्र राज्यच्या कार्यालयाने नामनिर्देशित केलेले २ जिल्हा निवडणूक अधिकारी,११ मतदान नोंदणी पर्यवेक्षक, व १४४ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी सहभाग नोंदवून मतदान नोंदणी व निवडणूक विषयक कार्य प्रशिक्षण पूर्ण केले. यामध्ये २३१- आष्टी विधानसभा मतदार संघाच्या वतीने पी.एम. श्री. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा हरिणारायण शाळेचे आदर्श शिक्षक तथा स्काऊट मास्टर बी.एल.ओ बापू शिंदे यांनी सक्रिय सहभाग नोंदवून प्रशिक्षण पूर्ण केले. याप्रसंगी भारताचे माननीय मुख्य निवडणूक आयूक्त ज्ञानेश कुमार साहेब यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्र राज्याचे सहाय्यक निवडणूक अधिकारी किरण



शार्दुल साहेब यांच्या हस्ते आष्टा भाग क्र. २३२ तालुका आष्टी चे बी.एल.ओ. बापू शिंदे यांना प्रशिक्षण योग्यरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, याकरिता भारत निवडणूक आयोगाने निर्देशित केलेले नॅशनल लेवल राष्ट्रीय ट्रेनर तथा उपजिल्हाधिकारी मूर्तिजापूर संदीपकुमार अपार साहेब ,उपजिल्हाधिकारी तथा राज्याचे सहाय्यक निवडणूक अधिकारी श्री. शार्दूल शेवाळे साहेब,उपजिल्हाधिकारी वणीचे श्री नितीन इंगोले साहेब, यांनी राज्यातील सर्व बूथ लेवल मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक यांना प्रशिक्षित केले. बापू शिंदे यांनी दिल्ली येथे प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल आष्टीचे आमदार सुरेश (आण्णा)धस साहेब,ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस साहेब, आष्टीच्या तहसीलदार वैशाली पाटील मॅडम, निवासी नायब तहसीलदार प्रकाश शिरसवाड,महसूल सहाय्यक अधिकारी शिवप्रसाद गारोळे साहेब,ऑपरेटर विशाल मोकाशी ,आष्टा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य अमर राजे निंबाळकर ,सरपंच गणेश माळवे,उपसरपंच वैभव पठाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय पठाडे, पतसंस्थेचे चेअरमन मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेशकुमार शिंदे, आष्टा हरिनारायण शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ मुटकुळे, मच्छिंद्रनाथ जगताप, नामदेव भिसे,श्रीरंग खोकले, केंद्रप्रमुख धर्मराज शिंदे, मधुकर धुमाळ, सुभाष बांगर,राजेंद्र भागवत, उमेश झांबरे, सोमनाथ वाळके, तुषार पवार, श्रीमती द्रौपदी गवळी,सुषमा जाधव,इत्यादींनी बापू शिंदे यांचे अभिनंदन केले.

# बागवे सरांचा कार्यपल्लव विद्यार्थ्यांच्या यशाचा पाया: शेखर निकम

## ‘स्पर्धा परीक्षा गणित’ पुस्तकाचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण, (प्रतिनिधी)-**

: “गणित हा विषय विद्यार्थ्यांच्या मनात भीती निर्माण करणारा ठरतो. मात्र शिक्षक विजय बागवे सरांनी आपल्या चाळीस वर्षांच्या अनुभवातून ‘स्पर्धा परीक्षा गणित’ हे पुस्तक अतिशय सोप्या आणि विद्यार्थीप्रिय भाषेत लिहिले आहे. हे पुस्तक विद्यार्थ्यांना दिशा देणारे ठरेल. बागवे सर शिक्षक झाले नसते, तर अनेक विद्यार्थी आज वेगवेगळ्या क्षेत्रात यशाच्या शिखरावर पोहोचलेले दिसले नसते,” अशा शब्दांत चिपळूण-संगमेश्वरचे आमदार शेखर गोविंदराव निकम यांनी बागवे सरांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. श्रीराम एज्युकेशन सोसायटी, चिपळूण आणि विजय बागवे सरांचे कुटुंबीय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘स्पर्धा परीक्षा गणित’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवार दिनांक ५ जुलै रोजी श्रीराम हायस्कूल, चिपळूण येथे उत्साहात पार पडला. वयाच्या ७६व्या वर्षी लिहिलेले हे पुस्तक विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची गोडी निर्माण करणारे ठरणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उदय गांधी होते. प्रमुख अतिथी म्हणून चिपळूण अर्बन को-ऑप. बँकेचे अध्यक्ष मोहनशेठ मिरगल, साहित्यिक प्रकाश देशपांडे, शिक्षण विस्तार अधिकारी रमाकांत पवार, उपाध्यक्ष कुंदाताई खेडेकर, निवृत्त मुख्याध्यापक श्री. फडके, श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष सई वरवटकर, कोषाध्यक्ष सिद्धेश लाड, सेक्रेटरी प्रशांत देवळेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी मल्लेश लकेश्री, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मिलिंद पंपुटकर, जिल्हा बँकेचे माजी संचालक राजन खेडेकर, वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. रत्नाकर थत्ते, चिपळूण अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष सतीशअप्पा खेडेकर, युनायटेड हायस्कूलचे निवृत्त शिक्षक मधुसूदन




केतकर, तसेच बागवे सरांच्या पत्नी मीनल बागवे आणि त्यांचे पुत्र अरविंद, अभिजीत, अनिकेत बागवे यांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निवृत्त प्राचार्य व श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे संचालक विनोद फणसे यांनी केले. त्यांनी सांगितले, “संस्थेचे संचालक असलेल्या बागवे सरांचे पुस्तक प्रकाशित करताना आम्हाला मोठा आनंद होत आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी गणिताची भीती दूर करून आत्मविश्वास देणारे हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरेल.” लेखक विजय गोविंद बागवे यांनी आपल्या भाषणात आपल्या शिक्षकी प्रवासाची सखोल झलक दिली.

“१९७०च्या दशकात मी न्यू इंग्लिश स्कूल, ओंबळी येथे शिक्षक म्हणून रुजू झालो. त्यानंतर श्रीराम हायस्कूल, चिपळूण येथे डेप्युटेशनवर प्रशिक्षणासाठी गेलो. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ‘सरप्लस’ झालो आणि ती शाळा सोडावी लागली. त्यानंतर मी कसबा हायस्कूल, चिपळूण येथे नोकरी स्वीकारली आणि निवृत्तीपर्यंत तिथेच कार्यरत होतो,” असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, “विद्यार्थ्याला समजेल, रुचेल आणि आत्मसात करता येईल अशा पद्धतीने शिकवणे हे माझे शैक्षणिक तत्त्व होते. गणितासारखा विषय शिक्षकाच्या शिकवण्यावर प्रेम करण्यास प्रवृत्त करतो, हे मी अनुभवले. माझे प्रमुख नेहमी विज्ञान-गणित प्रशिक्षणासाठी माझी शिफारस करत असत. यामुळे माझ्या क्षमतांना चालना मिळाली. नंतर श्रीराम एज्युकेशन सोसायटीच्या कमिटीत काम करण्याची संधी मिळाली.” शिष्यवृत्ती मार्गदर्शनाचा अनुभव सांगताना ते म्हणाले, “पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करत राहिलो. चिपळूणमध्ये स्थायिक झाल्यानंतर मी या कार्यासाठी अधिक वेळ देऊ शकलो. आजपर्यंत माझ्या मार्गदर्शनातून १८९ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झाले, ही माझ्यासाठी मोठी समाधानाची गोष्ट आहे.” पुस्तकाच्या निर्मितीत मोलाची भूमिका बजावणारे सुरेश काजरे (मांडणी व डीटीपी), तसेच प्रकाशक आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे, आणि योगेश कुंदुर व आपले कुटुंबीय यांचे त्यांनी विशेष आभार मानले.

कार्यक्रमात बागवे सरांचे विद्यार्थी ऋषिकेश लेले यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले, “सरांनी आम्हाला शिष्यवृत्ती मिळवण्यापुरतेच शिकवले नाही, तर आनंदाने शिकणे काय असते हे शिकवले. पैसे नाही, तर आत्मिक समाधान शोधणारा शिक्षक म्हणजे बागवे सर.”शिष्यवृत्तीधारक आराध्य सकपाळचे वडील अरविंद सकपाळ यांनी नमूद केले की, “मुलाच्या आयुष्यात सकारात्मक बदल बागवे सरांच्या वर्गात घडला. त्यांच्या शिकवण्यामुळे आत्मविश्वास वाढला.”

शिक्षक आनंद भुवड यांनी नवोदित शिक्षकांनी बागवे सरांसारख्या आदर्शांचा पाठपुरावा करावा, असे आवाहन केले. निवृत्त शिक्षक मधुसूदन केतकर यांनी सांगितले की, “बागवे सर हे ग. ना. दातार महाविद्यालयाचे पहिले विद्यार्थी आहेत. त्यांची शैक्षणिक वाटचाल आणि साधेपणा अनुकरणीय आहे.” शिक्षण विस्तार अधिकारी रमाकांत पवार यांनी शिक्षकांनी सेवेत असतानाच काहीतरी वेगळं करण्याचा प्रयत्न करावा आणि बागवे सरांचा आदर्श घेऊन काम करावे, असे मत मांडले.

साहित्यिक प्रकाश देशपांडे यांनी आपल्या भाषणात म्हटले की, “आज चांगले शिक्षक मिळणे दुर्मीळ झाले आहे. मात्र गणित हा नावडता विषय बागवे सरांनी आवडता केला. ते पदावर नसतानाही समाजासाठी काम करणारे आहेत. आज इतके लोक एका शिक्षकाच्या प्रेमामुळे येथे उपस्थित आहेत, हे त्यांच्या कार्याचे मोल अधोरेखित करणारे आहे.”

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका मानसी टाकळे यांनी ओघवत्या आणि प्रासादिक शैलीत केले.

अनिकेत बागवे यांनी सर्व मान्यवरांचे, कुटुंबियांचे, मित्रपरिवाराचे आणि उपस्थितांचे मन:पूर्वक आभार मानले.

## विंचूर येथील विखे पाटील मेमोरियल स्कूलमध्ये आषाढी एकादशी साजरी करण्यात आली.

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी
राजेश भडांगे
विंचूर :-

आषाढी एकादशी निमित्ताने विंचूर येथील विखे पाटील मेमोरियल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी दिंडी ने कार्यक्रमाच्या सुरुवात झाली विठ्ठल रुखमाईच्या प्रतिमेचे पुजन विठूरायची आरती ही करण्यात आली .विद्यार्थ्यांनी संताची वारकरी संप्रदायाची वेशभुषा केली न विद्यार्थ्यांनी हातात भगवे ध्वज घेवून टाळ मृदुंगाचा गजरात.... विठु माऊली चा गजर करीत विठ्ठल विठ्ठल जयहरी. ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोषात दिंडी काढली शाळेच्या परिसरात फिरताना संपूर्ण वातावरण "जय जय राम कृष्ण हरी" या पवित्र जपाने दूमदूमुन गेले होते. यावेळी सर्व शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका व पालक हजर होते













## जोगेश्वरीतील समाजसेवक कै. बाबा सिंह यांना भावपूर्ण श्रद्धांजली – २० वर्षे मोफत पुस्तक वाटप सेवा करणाऱ्या युगपुरुषाला अखेरचा निरोप

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**
जोगेश्वरी, ७ जुलै:

समाजसेवेचा सच्चा ध्यास घेत आपले संपूर्ण आयुष्य जनतेच्या हितासाठी समर्पित करणारे कै. बाबा सिंह यांचे आज सोमवार, दि. ७ जुलै २०२५ रोजी पहाटे ४.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. कै. बाबा सिंह हे माजी नगरसेवक असून त्यांनी जोगेश्वरी वेल्फेअर ट्रस्टचे चेअरमन म्हणून कार्य करत असताना अनेक सामाजिक उपक्रम राबवले. त्यामध्ये विशेष उल्लेखनीय म्हणजे गेल्या २० वर्षांपासून त्यांनी जोगेश्वरी परिसरातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत शालेय पुस्तकांचे वाटप करून शिक्षणाला हातभार लावला. त्यांच्या या सेवेचा हजारो विद्यार्थ्यांना लाभ झाला असून, अनेक कुटुंबांचे भवितव्य घडवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कोणताही गाजावाजा न करता, निस्वार्थपणे आणि निष्ठेने त्यांनी ही सेवा सुरू ठेवली. कै. बाबा सिंह हे समाजात शांत, अभ्यासू, मार्गदर्शक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जात होते. त्यांनी राजकारणात राहूनही समाजकार्याची दिशा कधीच न सोडली नाही. त्यांच्या निधनामुळे जोगेश्वरी परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. श्री साईनाथ पूजा कमिटी यांच्यातर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली असून, "ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो" अशी प्रार्थना करण्यात आली आहे.




# मुंबईत कोष्टी समाजाचे स्वमालकीचे सभागृह होण्यासाठी एकत्रित पुढाकार घ्यावा - सचिन देवांग

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी-**
**गुरुनाथ तिरपणकर**

मुंबईत कोष्टी समाजाचे स्वमालकीचे सभागृह झाल्यास मुंबई व ठाण्यात कार्यरत समाजाच्या धर्मादाय संस्था व समाज बांधवांचा सामाजिक प्रश्न सुटून पैशाची बचत होईल यासाठी मुंबईतील कोष्टी समाज समूहाने एकत्रित प्रयत्न केल्यास अशक्य नाही असे देवांग देवांगन कोष्टा कोष्टी फेडरेशनचे राष्ट्रीय सचिव व कोष्टी व्हिजन ट्रस्ट चे संस्थापक अड. सचिन देवांग म्हणाले.

समस्त कोष्टी समाज सेवा संस्था मुंबई* चे वतीने पाच जुलै रोजी कुर्ला, मुंबई येथे आयोजित स्नेह-मेळावा व गुणगौरव समारंभात देवांग प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.




कुणाचे कार्याचा लेखाजोखा न काढता आपल्या कार्याची उंची वाढवू पण एखाद्या ठिकाणी समाजहीत जोपासले जात नसेल तर वेळप्रसंगी कठोर भूमिका घ्यायला मागेपुढे पाहू नका. हक्का सोबत जबाबदारी देखील गरजेची आहे असे देवांग म्हणाले. मुंबईतील धावते जीवनमान व वातावरणातील सवयी अंगवळणी पडल्याने मुंबई बाहेरील वातावरण व कुटुंबात समरस होणे अडचणीचे ठरते याकरिता मुंबई व ठाण्यातील विवाहईच्छुक मुला-मुलींचे नोकरी व व्यावसायिक गरजा ओळखून मुंबईतच वधुवर मेळावा घेण्यासाठी एकत्रित पुढाकार घेऊ असेही देवांग म्हणाले. नव्वद वर्षे वयाचे समाज भूषण ध्रुतराज तारळकर मेळाव्याचे अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर जेष्ठ मार्गदर्शक ज्ञानदेव सरोदे, दानशूर उद्योगपती अजय हजारे, संस्थेचे अध्यक्ष निवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधाकर कांबळे व संस्थेचे पदाधिकारी होते. कोष्टी व्हिजन ट्रस्ट (के.व्ही.टी.) चे विश्वस्तपदी मुंबई विभागातून दत्ता कडुलकर व शामल भंडारे यांची नेमणूक झाल्याने शामल भंडारे हिचा के.व्ही.टी. कार्याध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. समस्त कोष्टी समाज सेवा संस्था मुंबई* तर्फे इयत्ता पहिली ते बारावीच्या मुला मुलींना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. सवित्ता डाके व दिलीपकुमार पाखले यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांचे प्रबोधन केले. संस्थेचे उपाध्यक्ष संतोष बाबर व लक्ष्मी टकले यांनी प्रस्तावना व संस्थेची माहिती सांगितली, खजिनदार राजेंद्र लिपारे तसेच मनोज कोष्टी यांनी समाज शिक्षण बाबत माहिती दिली. सूत्रसंचालन अस्मिता भंडारे, गीतांजली नेमाणे व सर्वेश कोष्टी यांनी केले. प्रचंड पाऊस पडत असताना मुंबई करांची उपस्थिती लक्षणीय होती. संस्थेचे अध्यक्ष सुधाकर कांबळे यांनी आभार व्यक्त केले.

# मुलांनो व्यसनी मित्रापासून दूर रहा दिलीप किसनराव आमले प्रमुख व्यसनमुक्ती जनजागृती

**दैनिक युवक आधार**
**नेरुळ प्रतिनिधी**

त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती अभियान व नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी पथक यांच्या संयुक्त विद्यमाने स्टर्लिंग कॉलेज सिवुड येथील 250 पेक्षा जास्त सायन्स कॉमर्स आर्ट च्या विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा व व्यसनमुक्ती जनजागृती याविषयावर योग्य मार्गदर्शन संवाद साधताना व्यसनामुळे आपल्या या शाळेतील किशोरवयीन वयामध्ये काय परिणाम होतो, केसा पासून पायाच्या नखापर्यत संपुर्ण शरिरावर कमजोरी येवून आपला एक एक अवयव निकामी होतो म्हणून व्यसनी मित्रान पासून सावध राहावे तसेच लायसन्स असेल तरच कुठलेही वाहन चालवायचे नेहमी सिट बेल्ट, हेल्मेट वापरून आपलीच जबाबदारी आपलीच सुरक्षा असे आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले यांनी सांगितले. तर विद्यार्थीनी अंमली पदार्थांच्या सेवना पासून लांब रहावे जर कधी अंमली पदार्थांच्या आहारी गेला आणि कधी जर पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल झाली तर आयुष्यभर सरकारी नोकरी मिळणार नाही आई वडील भाऊ बहीण आपल्या व्यसनामुळे दुखीत झालेले असतात असे भावनिक श्री संदिप निगडे साहेब वरिष्ठ पोलीस अधिकारी अंमली पदार्थ विरोधी पथक यांनी सांगितले. पालकांचाही यात सक्रिय सहभाग होता, तसेच मोबाईल वापर संबंधित सुरक्षा उपाययोजना कसा करायाचा या बाबत मार्गदर्शन केले.यावेळी स्टर्लिंग कॉलेजचे प्राचार्य श्री डॉ रविवर्मा सर ,विभाग प्रमुख कनिष्ठ महाविद्यालय - रेश्मा सावंत शिक्षक पालक विभाग प्रमुख डॉ सुप्रिया काळे ,वरिष्ठ महाविद्याय उपप्राचार्य प्रताप कदम सर व कॉलेज मधिल सर्व शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते





## अन्वर बापू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली परतूर तालुका अध्यक्ष बालासाहेब आकात यांच्या नेतुत्वात काँग्रेस पक्षाची बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना(अशोक ठोके)**

परतुर तालुक्यात काँग्रेस पक्षाला नव्याने बळकटी देण्याचे काम जेष्ठ नेते अन्वर बापू देशमुख यांच्या मार्गशनाखालीअन्वर करणार असुण येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या पंचायत समिती, जिल्हा परिषद,नगर परिषद निवडनुकी मध्ये काँग्रेस पक्ष, महाविकास आघाडीतील घटक पक्षाशी चर्चा करुण रणनिती ठरवणार आहे. परतुर तालुक्यात काँग्रेस पक्षाला माणनारा मोठा वर्ग असल्याचे मत जेष्ठ नेते अन्वर बापू देशमुख यांनी व्यक्त केले या वेळी तालुका अध्यक्ष बालासाहेब आकात यांनी उपस्थित प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नाना उत्तर देताना म्हटले की कॉग्रेस पक्षाची विचार धारा गाव, वाड्या, तांड्या पर्यत पोहचविण्याचे काम आम्ही सर्व करू तसेच शेतकरी कर्ज माफी,पिक कर्जासाठी येणाऱ्या काळात जनआंदोलन करण्यात येणार आहे.सध्या पक्षाची बांधणी चालू असुण येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समीती,नगर परिषद निवडनुकी मध्ये महाविकास आघाडी पूर्ण ताकतीने निवडनुकीच्या मैदानात उतरेल असे मत त्यांनी प्रसार माध्यमाशी बोलताना व्यक्त केले. या वेळी जेष्ठ नेते अन्वर बापू देशमुख तालुका अध्यक्ष बालासाहेब आकात, संतोष दिंडे, ,युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष अड,विलास राठोड, काँग्रेस शहर अध्यक्ष गणेश कुलकर्णी, मा.विधानसभा अध्यक्ष संतोष दिंडे सादेक बापू देशमुख , मा.सरपंच गिरी, मा. सरपंच दत्ता तरवटे , राजू काकडे आदी पदाधीकारी उपस्थित होते.

# किर्ला ग्रामपंचायतच्या कामात लाखोचा भ्रष्टाचार

## (गावकऱ्यांनी केली जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार )

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी नामदेव मंडपे मंठा**
**(मंठा )**

तालुक्यातील किर्ला ग्रामपंचायतच्या कामकाजात भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप समोर आले आहेत. गावातील काही नागरिकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे या भ्रष्टाचाराच्या प्रकरणी तक्रार नोंदवली आहे. या तक्रारीत ग्रामपंचायतच्या निधीचा गैरवापर,तांडा सुधार वस्ती, दलित वस्ती, पाणि पुरवठा, सभागृह मातोश्री पांदन रस्ता कामातील अनियमितता आणि महत्त्वाच्या विकासकामांत घोटाळ्याबाबत तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या निधीचा वापर सार्वजनिक कामांसाठी केला जाणे आवश्यक आहे, पण या निधीचा काही भाग अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने चुकीच्या प्रकारे लपवला जात आहे. पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, शाळा आणि आरोग्य सुविधा यांसारख्या विकासकामांसाठी निधीमध्ये भ्रष्टाचारामुळे काम अपूर्ण राहिलेले आढळले आहे. यामुळे गावातील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. १४ व १५ वित्त आयोग मातोश्री पादन रस्ता, तांडा सुधार वस्ती, दलीत वस्ती रस्ता, घरकुल, शेंड नेट, संभामंडप, पाणी पुरवठा कामाची कसुन चौकशी करून चौकशी पूर्ण होई पर्यंत कोणतेच देयके अदा करू नये दोषीवर कार्यदेशीर कार्यवाही करण्याची मागणी गावकर्यांनी निवेदनाच्या शेवटी करण्यात आली आहे. निवेदनावर आशिष चव्हाण,नारायण खंदारे, अकबर पठाण, विनोद राठोड, सचिन चव्हाण,सचिन राठोडसह आदींच्या सह्या आहेत

**ग्रामसेवकाची मुजोरी**
ग्रामसेवक मुख्यालय राहत नसुन गावामध्ये कधीच फिरकत नाही सतत फोन बंद ठेवतो त्यामुळे लोकांनी कामे वेळवर होत नसुन ग्रामसेवक यांची बदली करून नवीन ग्रामसेवक द्यावा .

**घरकुलसाठी वसुली चालु**
शासनाणे गोरगरीबसाठी किर्ला गावामध्ये ७० घरकुल मंजुर केले आहे. मात्र झालेले असून सरपंच पती व उपसरपंच हे पदाचा गैरवापर करून लाभार्थ्या कडून घराचे बील काढण्यासाठी प्रती लाभाथी २०००/- रूपये व घर न बांधता बिल काढण्यासाठी १०,०००/- रूपये ग्रामसेवक यांच्या नावाखाली लाभार्थ्याकडून वसुली करत असून ग्रामसेवकांना विचारले असता हे माझ्या नावाखाली असे करत आहेत त्याबद्दल मला कुठलीही माहिती नाही. दोषीवर कार्यवाही करण्यात यावी.

**१४वा व १५वा वित्त आयोगात भ्रष्टाचार**
ग्रामपंचायतीने १४ व १५ वित्त आयोगातुन प्राप्त झालेल्या निधीतुन शालेय साहित्य खरेदी न करता परसपर बोगस बिल लावून रक्कम उचलण्यात आली आहे.१४ वित्त आयोग व १५ वित्त आयोग २०२० ते २०२५ पर्यंत कामाची चौकशी करून दोषीवर कार्यवाही करण्यात यावी.

**पांदन रस्ता कामात अनियमितता**
रोजगार हमी मधून किर्ला ते भुवन पांदण रस्ता रस्ता २०२३-२४ मध्ये मंजुर झाला असून रोजगार हमी नियमानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या अंदाज पत्रकानुसार काम न करता सरपंच, उपसरपंच, सरपंचाचे पती ग्राम रोजगार सेवक असुन पदाचा गैरवापर करून ग्राम सेवकावरती दडपण टाकूण त्या रस्त्याचे काम मुरूम खंडीकरण केले नसुन जे.सी.बी च्या सहाय्यने रस्त्या लगत नाली मारून त्या मधील काळी माती रस्त्यावर टाकूवन रस्ता केला आहे. बील काढण्यात आले असून तरी त्या रस्त्याची चौकशी होणे गरजेची आहे.

**सिंचन विहीरीसाठी लुटमार**
रोजगार हमी योजने अंतर्गत विहीर मंजुर करण्यासाठी लाभार्थ्याकडून सरपंच पती रोजगार सेवक या दोन पदाचा गैरवापर करून विहीर मंजुरीसाठी २०,०००/- रूपये ची रक्कम लाभार्थ्याकडून घरातल्याचा आरोप करण्यात आला आहे

# श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या आषाढी दिंडीने मुरुडमध्ये आवतरली पंढरी .

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी**
**मोहम्मद पिंजारी**

मुरुड परिसरात नामांकित असणाऱ्या व सीबीएसईचे प्रभावी अध्यापन करणाऱ्या श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून आषाढी एकादशी निमित्त आषाढी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते . संस्थेचे आधारवड कै. गोरोबा ( काका ) झाडके यांच्या संकल्पनेतून मागच्या दहा वर्षापासून ही दिंडी काढली जाते . दिंडीला संस्थेचे अध्यक्ष दिपक झाडके , सचिव प्रा. दत्तात्रय जाधव , प्रा. शंकर पाटील व सदस्या श्रीमती अश्विनीताई झाडके यांचे मार्गदर्शन लाभले . सर्वप्रथम मारुती मंदिर या ठिकाणी प्राचार्य बाबू थॉमस , उपप्राचार्य उमेश कुंभार व समन्वयक रामेश्वर शेटे यांच्या हस्ते पुजन करण्यात आले . त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . मुरुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अशोक उजगरे व सौ . उजगरे मॅडम यांच्या हस्ते पालखीची पुजा करून दिंडीला सुरुवात करण्यात आली . छत्रपती शिवाजी महाराज चौकात संस्थेचे अध्यक्ष दिपक झाडके , सचिव प्रा. दत्तात्रय जाधव , सदस्या अश्विनी झाडके , रामेश्वरी झाडके , ओम झाडके व गंगापूर येथील माझी मुख्याध्यापक महिंद्रकर सर यांच्या हस्ते पुजा करून आरती करण्यात आली . अण्णाभाऊ साठे चौकातून विठ्ठल मंदिर या ठिकानी दिंडीचे प्रस्तान झाले . शाळेतील विद्यार्थ्यांनी ठिकठिकाणी विठ्ठलाच्या गाण्यावर नृत्य सादर केले . तसेच विद्यार्थ्यांना अनेक ठिकाणी फराळ तथा खाऊचे वाटप करण्यात आले . सोबत पाणी बॉटली देण्यात आली . सजवलेल्या ट्रक्टर्स मध्ये विठ्ठल - रुक्मीनीसह विविध संताच्या भुमीकेतील पात्र दिंडीचे आकर्षण ठरले सदरील दिंडी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामेश्वर शेटे यांनी केले .



मुरुड व मुरुड परिसरातील पालकांनी प्रचंड प्रतिसाद दिला . विद्यार्थ्यांची शिस्त , स्वच्छता , संताचा जयघोष या सर्व बाबी लक्षवेधक होत्या . कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचा फुगडी हा कार्यक्रम सर्वांसाठी आनंददायी ठरला. शेवटी शाळेत विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले त्याचा सर्वांनी मनसोक्त आस्वाद घेतला .

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालाजी भिसे , राजेश बावळे , आदित्य सिंग ,प्रशांत कुलकर्णी , उमेश मारकड , नितीन एम. जी. तसेच बबीता गिरी , वैशाली देशमुख ,गीता फेरे , अर्चना पाटील , ज्योती वांगस्कर , श्रीदेवी माशाळकर , रेश्मा कुंभार , संगीता बिटले ,ज्योती ढेकणे , संध्या माळी , आकांक्षा लोमटे , अश्विनी नाडे , उषा नाईकनवरे , शांती मार्डी , क्लॅरम्मा जेकप , महादेवी देशमुख , रुचिता इरपतगीरे, जयश्री जाधव, श्रद्धा शितोळे, बबीता सिंग, सना पठाण , प्रगती कुंभार , रोहीनी कासार , तृप्ती काळे , वैष्णवी जगताप यांच्यासह शाळेतील बसचे चालक व शाळेतील मावश्या यांचे सहकार्य लाभले . मुरुडमध्ये पंढरी अवतारल्याचे दर्शन मुरुडकरांना झाले . समाजातील सर्व स्तरातून शाळा व विद्यार्थ्यांचे कौतुक होताना दिसून येते .

# श्री ज्ञानेश्वर मंदिरात काळे दापत्यांकडून 151 तुळशी रोपाचे वाटप

### खा. सुनील तटकरे यांच्या 60 व्या वाढदिवसानिमित्त केला कार्यक्रम



**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

श्री ज्ञानेश्वर मंदिरात नागोठणे ग्रामपंचायत सदस्या पूनम प्रथमेश काळे व प्रथमेश काळे या दापत्यांकडून रविवार 06 जुलै रोजी आषाढी एकादशीचे औचित्त साधून तसेच खा.सुनील तटकरे यांच्या 60 व्या वाढदिवसानिमित्त माजी सरपंच नरेंद्र जैन, माजी सरपंच विलास चौलकर,प्रथमेश काळे व पूनम काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत 151 तुळशी रोपाचे वाटप करण्यात आले. यावेळी रतन हेंडे,राजेश पिंपळे,प्रकाश मोरे,मधुकर महाडीक,दीपाली टके,श्वेता चौलकर,आशा शिर्के,प्रतिभा तेरडे,सुजाता जवके, सुनीता ईप्ते,अनीता पवार,राजेश्री टेमकर,कल्पना शहासने,राजेंद्र मोदी,भारत भोय,नीलेश म्हात्रे तसेच मंदिरातील भाविक उपस्थित होते.